सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १५८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## महाराष्ट्र टीईटी पेपरफुटी प्रकरण; बीड आणि बिहारमधून 2 फरार आरोपी अटकेत, सर्व गजाआड

**बीड :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणात फरार असलेल्या दोन मुख्य संशयित आरोपींना बीड आणि बिहार येथून अटक करण्यात आली आहे. प्रकाश मिसाळ आणि अशोक साव अशी या अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या दोघांच्या अटकेमुळे चार्जशीटमध्ये नाव असलेल्या सर्व १८ आरोपींना आता पोलिसांनी गजाआड केले आहे.

पोलिसांच्या सखोल तपासातून महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्ली या राज्यांमध्ये पसरलेले एक मोठे आंतरराज्यीय परीक्षा घोटाळा असल्याचे उघड झाले. विशेष तपास पथकाने कसून शोध घेत प्रकाश मिसाळ आणि अशोक साव या दोघांनाही अटक केली.

२८ जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेच्या एक दिवस आधी हा गैरप्रकार समोर आला होता. भिवंडीतील एका रहिवाशाला प्रश्नपत्रिका विकण्याचा प्रयत्न तीन जण करत असल्याची गुप्त पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कोणगाव परिसरात डमी ग्राहकांच्या मदतीने सापळा रचला आणि संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे प्रश्नपत्रिकेचे चार सेट मिळाले.त्यानंतर पोलिसांनी त्या प्रश्नपत्रिका महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडून तपासून घेतल्या. जप्त करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिका मूळ प्रश्नपत्रिकेशी तंतोतंत जुळत असल्याचे समोर आले.

ठाणे पोलिसांनी भिवंडी न्यायालयात दाखल केलेल्या चार्जशीटनुसार, या घोटाळ्याचा थेट संबंध उत्तर प्रदेशातील आग्रा इथल्या एका प्रिंटिंग प्रेसशी होता. प्रेसमधील दोन कर्मचाऱ्यांनी ८,००० रुपयांसाठी प्रश्नपत्रिका कारखान्यातून चोरून बाहेर काढल्या होत्या. ही प्रश्नपत्रिका त्यांनी आपल्या बुटाच्या इनसोल्समध्ये लपवून बाहेर आणल्याचे तपासात समोर आले. भिवंडी न्यायालयात शुक्रवारी दाखल करण्यात आलेल्या चार्जशीटमध्ये मुख्य सूत्रधार बिजेंद्र गुप्ता याच्यासह एकूण १८ जणांची नावे आहेत. बिजेंद्र गुप्ता याच्यावर यापूर्वी ओडिशातील एका पेपरफुटी प्रकरणातही आरोप झाले आहेत. सर्व आरोपींवर विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# आरोग्यसेवा शिक्षणात राष्ट्रीय अभ्यासक्रम यंदापासून लागू होणार - राज्य सरकारकडून अंमलबजावणी

### चार स्वायत्त मंडळांमुळे शिक्षण, मूल्यांकन आणि नोंदणीला सुसूत्रता



**मुंबई :** राज्यातील सहयोगी आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि नियमन अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने 'महाराष्ट्र राज्य सहयोगी व आरोग्यसेवा परिषदे'च्या कामकाजाला गती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर परिषदेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, राष्ट्रीय स्तरावरील अद्ययावत अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून महाराष्ट्रात लागू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

सहयोगी आरोग्यसेवा क्षेत्रातील शिक्षणाचा दर्जा, व्यावसायिक मानके आणि सेवांचे नियमन यासाठी ही परिषद काम करणार आहे. संस्थांचे मूल्यांकन, व्यावसायिकांची राज्यस्तरीय नोंदणी तसेच आधुनिक वैज्ञानिक प्रगतीचा आरोग्यसेवेत स्वीकार यांचाही परिषदेच्या कार्यक्षेत्रात समावेश आहे. आरोग्यसेवा क्षेत्रातील शिक्षण आणि कामकाजात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी परिषदेअंतर्गत चार स्वायत्त मंडळे स्थापन करण्यात येणार आहेत. त्यामध्ये पदवीपूर्व सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, पदव्युत्तर सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय मूल्यांकन व मानांकन मंडळ तसेच सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय आचारसंहिता व नोंदणी मंडळ यांचा समावेश आहे.

सहयोगी आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या नोंदणी प्रक्रियेसाठी केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वांना मान्यता देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे पुढील कार्यवाहीचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यात फिजिओथेरपिस्ट, रेडिओग्राफर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, नेत्रतज्ज्ञ, आहारतज्ज्ञ यांसह ५० हून अधिक विषयांमध्ये प्रशिक्षणाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील अद्ययावत अभ्यासक्रम राज्यात लागू झाल्यानंतर या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अधिक सुसंगत आणि मानकीकृत शिक्षण व प्रशिक्षण उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. परिषदेच्या माध्यमातून शिक्षण, मूल्यांकन, मानांकन, आचारसंहिता आणि नोंदणी या विविध बाबींना स्वतंत्र संस्थात्मक चौकट मिळणार आहे. त्यामुळे सहयोगी आरोग्यसेवा क्षेत्रात व्यावसायिक मानके निश्चित करण्याबरोबरच नोंदणी आणि नियमनाची व्यवस्था अधिक सुसूत्र करण्यावर भर राहणार आहे.

## अशोकजी सिंगल यांच्या स्मृती वंदन जनशताब्दी वर्षा निमित्त विविध संत महंतांच्या उपस्थितीत सभेचे आयोजन



तभा वृत्तसेवा

**खुलताबाद प्रतिनिधी :** विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून श्रद्धेय अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून देशभर दि. २७ सप्टेंबरपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या जन्मशताब्दी वर्षात विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून संघटना व समाजामध्ये कार्य करणाऱ्या सेवकांना सोबत घेऊन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच हिंदू समाजासाठी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या सेवाभावी व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरात अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता, संत एकनाथ रंग मंदिर सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे "राममंदिर योद्धा स्मृती वंदन सभा"या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची स्वागत समिती गठित करण्यात आली आहे.

सदर कार्यक्रमासाठी विविध पंथ व संप्रदायातील प्रमुख मंडळी उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांचीही उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. हुकुमचंदजी सावला, अखिल भारतीय उपाध्यक्ष, विश्व हिंदू परिषद तसेच श्री क्षेत्र देवगड संस्थांना मठपती परम पूज्य भास्कर गिरी महाराज श्री क्षेत्र वेरूळ जगद्गुरु महामंडलेश्वर स्वामी शांतीगिरी महाराज महंत अभयानंद गिरी महाराज कैलास आश्रम. सद्गुरु नाथ योगिनी अक्काताई महाराज नाथ अश्राम वेरुळ वामदेव तीर्थ टाका स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे . श्रद्धेय अशोकजी सिंघल यांच्या कार्याचा इतिहास, त्यांचे योगदान आणि त्यांच्या कार्यातून मिळणारी प्रेरणा याविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

## शिर्डीत चैन स्नॅचिंग करणाऱ्या दोघांना अटक; पाच गुन्ह्यांची उकल; 3.58 लाखांचा मुद्देमाल जप्त

शिर्डी (प्रतिनिधी) शिर्डी शहर व परिसरात चैन स्नॅचिंग, जबरी चोरी आणि दुचाकी चोरी करणाऱ्या दोन सराईत आरोपींना शिर्डी पोलिसांनी अटक केली. त्यांच्या चौकशीत शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल असलेले पाच गुन्हे उघडकीस आले असून, पोलिसांनी सोन्याचे दागिने व दोन दुचाकी असा एकूण ३ लाख ५८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिर्डी शहरात पोलिसांचे मार्गक्रमण सुरू असताना बन्सी हॉटेलजवळ दोन संशयित दुचाकीवरून फिरत असल्याची माहिती तपास पथकातील पोलिस अंमलदार सतपाल चव्हाण यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. पोलिसांनी पाठलाग करून प्रेम सुधाकर पवार (वय २७) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनंतर पळून गेलेल्या विनोद गंगाराम पवार यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले.

दोघांची सखोल चौकशी केली असता त्यांनी यापूर्वी शिर्डी शहर व परिसरात चैन स्नॅचिंग तसेच दुचाकी चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानुसार २ जुलै रोजी रांजणगाव देशमुख, २६ ऑगस्ट रोजी श्री साईबाबा मंदिरालगत नगर-मनमाड रस्ता आणि ५ सप्टेंबर रोजी पिंपळवाडी रस्ता, अल्ट्राटेक सिमेंट दुकानाजवळ महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व चैन जबरीने ओढून चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

तसेच २५ एप्रिल रोजी कालिकानगर येथील साईबाबा रुग्णालयातून स्प्लेंडर दुचाकी आणि १९ मे रोजी शाईन दुचाकी चोरी केल्याची कबुली आरोपींनी दिल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या घटनांप्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार पाच गुन्हे दाखल आहेत.

**चार सोन्याच्या लगडींसह दुचाकी जप्त**

पोलिसांनी आरोपींकडून २० ग्रॅम वजनाची १ लाख ४० हजार रुपये, १८ ग्रॅम वजनाची १ लाख ८ हजार रुपये, ५ ग्रॅम वजनाची ३५ हजार रुपये आणि २.५ ग्रॅम वजनाची १५ हजार रुपये किमतीची सोन्याची लगड, तसेच ३० हजार रुपये किमतीची होंडा शाइन आणि ३० हजार रुपये किमतीची स्प्लेंडर दुचाकी जप्त केली.

**विविध जिल्ह्यांत गुन्ह्यांची नोंद**

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी विनोद गंगाराम पवार याच्याविरुद्ध नाशिक शहर, नाशिक ग्रामीण आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांत जबरी चोरी, चोरी आदी स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याच्याविरुद्ध आडगाव, सिन्नर, भद्रकाली, निफाड, बॉम्बेनाका, अंबड, संगमनेर शहर, तोफखाना आणि लोणी आदी पोलीस ठाण्यांत गुन्हे नोंद आहेत.

आरोपी प्रेम सुधाकर पवार याच्याविरुद्धही नाशिक शहरातील उपनगर व भद्रकाली पोलीस ठाण्यांत जबरी चोरीसह विविध गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाकचौरे आणि शिर्डी विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक कल्पेशकुमार चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, सागर काळे, प्रदीप बोराडे, महिला पोलीस उपनिरीक्षक आकांक्षा जाधव यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक आकांक्षा जाधव करीत आहेत.

## 'तात्याची पैठणी' महाराष्ट्र अन् कर्नाटकात हाऊसफुल्ल! गणेशोत्सवात महिलांसाठी ठरतोय मनोरंजनाचा महाधमाका

**पैठण प्रतिनिधी :-** श्रीक्षेत्र पैठणचे भूमिपुत्र 'बाळूमामाच्या नावानं चांगभलं' या लोकप्रिय मालिकेतील 'तात्या' हे पात्र घराघरांत पोहोचले आहे. मालिकेत भांडणे लावणारा, तोंडात पान चघळणारा आणि स्वतःच्या खास शैलीने ओळखला जाणारा हाच 'तात्या' आता प्रत्यक्ष रंगमंचावर वेगळीच हवा करत आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित 'तात्याची पैठणी' या विशेष कार्यक्रमाला महाराष्ट्र आणि कर्नाटकात महिलांचा तुफान प्रतिसाद लाभत असून सर्व कार्यक्रम अक्षरशः हाऊसफुल्ल ठरले आहेत.

महिलांसाठी खास तयार करण्यात आलेला हा 'तात्याची पैठणी' खेळ केवळ स्पर्धा नसून निखळ कौटुंबिक मनोरंजनाचा आणि विनोदाचा महाधमाका ठरत आहे. पहिल्याच गणेशोत्सवात मंडळांनी आधीच सर्व तारखा बुक करून हा खेळ मोठ्या उत्साहात पार पाडला.

**या प्रमुख ठिकाणी रंगला 'तात्याची पैठणी'चा खेळ:**

**पुणे परिसर:** वाघोली, डी.एस.के. विश्व (धायरी) आणि भोसरी.



**सोलापूर जिल्हा:** सांगोला (लोहार गल्ली व मस्के कॉलनी).

**कोल्हापूर व सीमाभाग:** कोल्हापूर शहर, किणे (आजरा तालुका, गडहिंग्लजजवळ), शिरडवाड (हुपरी जवळ) आणि आदमापूर.

**कर्नाटक सीमाभाग:** बोरगाव तसेच अनूर (निपाणीजवळ, आप्पाची वाडी व आदमापूर परिसर). या सर्व ठिकाणी महिलांनी मोठी गर्दी करत पैठणी जिंकण्याचा आनंद लुटला आणि तात्याच्या विनोदी शैलीला भरभरून दाद दिली.

## नशा करून दरोड्याच्या तयारीत असलेले तिघे ताब्यात

**शिर्डी (प्रतिनिधी) :** शिर्डी शहरात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा शिर्डी पोलिसांनी पर्दाफाश केला असून पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार कारवाई करत तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून धारदार चाकू, नशेचे इंजेक्शन, सहा रिकाम्या सिरिंज आणि मोटारसायकल असा सुमारे ५० हजार ४२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, १९ सप्टेंबर रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास शिर्डीतील कालिकानगर ते बन रोड, राजगुरुनगर परिसरात काही सराईत गुन्हेगार मोठा गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक रणजित गालांडे यांच्या पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत कारवाई केली.

या कारवाईत सावड्या ऊर्फ साईनाथ गोरक्षनाथ पाचारणे (रा. राजगुरुनगर, शिर्डी), कुणाल प्रकाश मुदलीयार (रा. पानमळा, शिर्डी) आणि प्रथमेश बबन घोरपडे (रा. पानमळा, शिर्डी) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्यासोबत असलेले सौरव किरण गायकवाड व मुसा (पूर्ण नाव उपलब्ध नाही) हे पोलिसांची चाहूल लागताच पसार झाले.

ताब्यात घेतलेल्या आरोपींची अंगझडती घेतली असता २१ सेंटीमीटर लांबीचा धारदार चाकू, ३० मिली क्षमतेची नशेच्या इंजेक्शनची बाटली, सहा रिकाम्या सिरिंज आणि काळ्या रंगाची हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल असा मुद्देमाल आढळून आला. या प्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात दरोड्याची पूर्वतयारी केल्याप्रकरणी गुन्हा क्रमांक ८२६/२०२६ भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१०(४), ३१०(५) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध यापूर्वीही विविध पोलीस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाकचौरे आणि शिर्डी विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रणजित गालांडे यांच्या पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रदीप बो-हाडे करीत आहेत.

## माजी आ. नामदेवराव पवार यांच्या नेतृत्वाखाली पिशोर नाक्यावर धरणे आंदोलन;शेतकऱ्यांसाठी सरसकट 50 हजारांच्या अनुदानाची मागणी

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.२१ सप्टेंबर - तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवरून माजी आमदार नामदेवराव पवार यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी पिशोर नाका येथे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी राज्य सरकारच्या धोरणांवर निशाणा साधत कन्नड तालुका दुष्काळग्रस्तांच्या यादीतून का वगळण्यात आला, असा सवाल उपस्थित करण्यात आला. शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन मंडळ अधिकारी यांनी स्वीकारले.



कन्नड तालुक्यातील शेतकरी नैसर्गिक संकटे, पीक नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणींमुळे त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत तालुक्याला दुष्काळग्रस्तांच्या यादीतून वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांना दिलासा कसा मिळणार, असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, कन्नड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविम्यानुसार नुकसानभरपाई द्यावी, सरसकट ५० हजार रुपये अनुदान द्यावे, वाढत्या महागाईवर नियंत्रण आणावे, चारा छावण्या सुरू करून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, तसेच २०२५ मधील शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान व विम्याचे पैसे तातडीने द्यावेत, अशा विविध मागण्या करण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा. अन्यथा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविणे सुरूच राहील, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

या आंदोलनात माजी आमदार नामदेवराव पवार,गणेश शिंदे, नगराध्यक्ष फरीनबी अब्दुल जावेद,नगरसेवक अब्दुल जावेद,अयाज शाह,भाऊसाहेब पवार, प्रकाश बारगळ, प्रभाकर काकडे, असद पठाण, सुमित्रा आव्हाळ, अब्दुल याकूब, बाबासाहेब मुरकुंडे,भागीनाथ इघे, आणि मुक्तार खान यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# हदगावमध्ये एकाच रात्री नऊ दुकाने फोडली; व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

तभा वृत्तसेवा

हदगाव, दि.२१ सप्टेंबर

शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घालत एकाच रात्री तब्बल नऊ दुकाने फोडल्याची घटना शनिवारी-रविवारी (दि. १९ ते २० सप्टेंबर) मध्यरात्री घडली. श्रीधरनगर येथील श्री साई कॉम्प्लेक्समधील सात दुकाने, नांदेड रोडवरील चव्हाण बिअर शॉपी आणि बसस्थानकाजवळील देशी दारूचे दुकान फोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रकमेसह एकूण १ लाख ८ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. या घटनेमुळे हदगाव शहरात व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुकृपा झेरॉक्स मल्टी सर्व्हिसेसचे चालक राजू शिवाजी कदम (वय ४२, रा. कमलाईनगर, हदगाव) यांनी याबाबत हदगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. कदम यांनी १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता दुकान बंद करून घर गाठले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी सुमारे ७.१० वाजता शेजारील दुकानदार संदीप करडखेले यांनी फोन करून श्री साई कॉम्प्लेक्समधील अनेक दुकाने फोडल्याची माहिती दिली. त्यानंतर कदम यांनी घटनास्थळी धाव घेतली असता त्यांच्या दुकानासह कॉम्प्लेक्समधील सात दुकानांचे शटर वाकवून चोरी झाल्याचे निदर्शनास आले. दरम्यान, नांदेड रोडवरील शिवपार्वती मंगल कार्यालयाजवळील चव्हाण बिअर शॉपी तसेच बसस्थानकाजवळील अवधुत माधवराव शिंदे यांच्या देशी दारूच्या दुकानातही चोरी झाल्याचे समोर आले.



दुकानदारांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता मध्यरात्री १२ ते पहाटे ३ वाजेच्या दरम्यान तीन अज्ञात चोरटे दुकानांमध्ये चोरी करताना दिसून आले. त्यामुळे पोलिसांसमोर आता या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. श्री साई कॉम्प्लेक्समधील गुरुकृपा मल्टी सर्व्हिसेसमधून ४० हजार रुपये, गजानन मल्टी सर्व्हिसेसमधून ३० हजार रुपये, सूर्यवंशी मल्टी सर्व्हिसेसमधून ८ हजार रुपये, मल्टी सर्व्हिसेस झेरॉक्समधून ५ हजार रुपये, श्री श्याम मल्टी सर्व्हिसेसमधून ५ हजार रुपये, लक्ष्मीनारायण दुकानातून ४ हजार रुपये आणि बळिराजा मल्टी सर्व्हिसेसमधून ४ हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेली. याशिवाय अवधुत शिंदे यांच्या देशी दारू दुकानातून ९ हजार रुपये, तर चव्हाण बिअर शॉपीतून १ हजार रुपये रोख व २ हजार २४० रुपयांच्या बिअरच्या बाटल्या असा एकूण ३ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. घटनेची माहिती पोलिसांना २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३९ वाजता मिळाली. त्यानंतर सायंकाळी ६.५० वाजता हदगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक २७६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ) व ३३४(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

**सीसीटीव्ही फुटेजमुळे तपासाला दिशा**

एकाच रात्री नऊ दुकाने फोडून चोरट्यांनी शहरातील सुरक्षा व्यवस्थेलाच आव्हान दिले आहे. तीन संशयित चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने त्यांच्या हालचालींच्या आधारे पोलिसांना तपासाची दिशा मिळण्याची शक्यता आहे. चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कारवाई करावी, अशी मागणी व्यापारी व दुकानदारांकडून होत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# काजू खा...बदाम खा...पण शेतकऱ्यांना मदत करा : आ. रोहित पवार

## शेतकऱ्यांच्या बांधावर, शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार मदत करा...!

**अंबाजोगाई :** "काजू खा... बदाम खा... पण शेतकऱ्यांना मदत करा," अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी देवेंद्र फडणवीस सरकारकडे केली.

अंबाजोगाई तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाच्या पाहणी दरम्यान रविवारी (दि. 20 सप्टेंबर) त्यांनी दगडवाडी येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

यावेळी माध्यमांशी बोलताना रोहित पवार म्हणाले की, मराठवाड्यात दुष्काळाचे विदारक चित्र आहे. सोयाबीनचे पीक 100 टक्के वाया गेले असून खरीपातील इतर पिकांची अवस्थाही गंभीर आहे. संपूर्ण खरीप हंगाम वाया गेले असून पाऊस नसल्याने रब्बी हंगामाचीही आशा राहिलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये तातडीची मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी माध्यमांशी बोलताना रोहित पवार म्हणाले की, मराठवाड्यात दुष्काळाचे विदारक चित्र आहे. सोयाबीनचे पीक 100 टक्के वाया गेले




असून खरीपातील इतर पिकांची अवस्थाही गंभीर आहे. संपूर्ण खरीप हंगाम वाया गेला असून पाऊस नसल्याने रब्बी हंगामाचीही आशा राहिलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये तातडीची मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

**5 ऑक्टोबरपर्यंत वाट पाहू नका...! :** सरकार दुष्काळ जाहीर करण्याबाबत वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला. "कर्नाटक सरकारने शेतकऱ्यांसाठी योग्य पावले उचलून दुष्काळ जाहीर केला आहे. मात्र, महाराष्ट्र सरकार अजूनही 5 ऑक्टोबरची वाट पाहत आहे.परतीच्या पावसाने परिस्थिती बदलेल आणि सरकारचे पैसे वाचतील, अशी अपेक्षा सरकारला आहे. परंतू, तोपर्यंत शेतकरी देशोधडीला लागलेला असेल, असे ते म्हणाले. त्यामुळे कोणाचीही वाट न पाहता राज्य सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली.

**24 सप्टेंबरला बीडमध्ये शेतकऱ्यांचा मोर्चा :** बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यांच डोक ठिकाणावर आणण्यासाठी 24 सप्टेंबर रोजी बीड येथे शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती रोहित पवार यांनी दिली. या मोर्चात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. आमदार रोहित पवार यांच्या दुष्काळी पाहणी दौऱ्यात आमदार संदीप क्षीरसागर, राजेसाहेब देशमुख, माजी आमदार पृथ्वीराज साठे, डॉ.नरेंद्र काळे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, तालुकाध्यक्ष अमर देशमुख शहराध्यक्ष ॲड. ईस्माइल चौधरी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## कोल्हेवाडी, जीवाचीवाडी, तरनळी येथे सोयाबीन कापणी, मळणी, साठवणूक प्रशिक्षण संपन्न



केज - पुढील खरीप हंगामा करिता शेतकऱ्यांनी घरचे बियाणे वापरून उत्पादन खर्च कमी करण्याच्या दृष्टीने दर्जेदार बियाणे निर्मितीसाठी कृषी विभागामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, उपविभागीय कृषी अधिकारी राहुल गायकवाड, तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (एनडीकेएसपी) अंतर्गत कोल्हेवाडी, जीवाचीवाडी तरनळी येथे सोयाबीन पिकाची शेतीशाळा घेऊन उपविभागीय तंत्रज्ञान समन्वयक शिवप्रसाद येळकर यांनी दर्जेदार सोयाबीन बियाणे निर्मितीसाठी शेतकऱ्यांना बुरशीजन्य रोगग्रस्त झाडांची निरीक्षणे दाखवून काढणी करताना रोगग्रस्त, पाण्या किंवा चिखलामध्ये बुडून खराब झालेले झाडे निवडू नयेत, दोन वेगवेगळ्या जातींचे सोयाबीनचे ढीग वेगवेगळे करणे, सोयाबीन काढणी करताना झाड उपटून घेतल्यामुळे मुळांना माती चिटकून येते त्यामुळे शेतमालामध्ये मातीचे प्रमाण वाढून भाव कमी मिळतो त्यामुळे काढणी करताना व्यवस्थित विळ्याच्या साह्याने सोयाबीनचे झाड कापून घ्यावे. मळणी करताना बियाणे फुटू नये यासाठी मळणी यंत्राची गती ३०० ते ३५० फिरे प्रतिमिनिट ठेवावी, बियाणे उन्हामध्ये वाळवून ओलाव्याचे प्रमाण १२ टक्के पेक्षा कमी करून सुतळी पोत्यांमध्ये हवेशीर जागेत ठेवावे. थप्पी ७ फुटांपेक्षा जास्त उंच ठेवू नये याची माहिती दिली. तसेच ठिबक व तुषार सिंचनासाठी आगाऊ अनुदान पद्धतीबाबत माहिती देऊन पाण्याचा काटकसरीने वापर करून दुष्काळी परिस्थितीत रब्बी पिकांची जोपासना करण्यासाठी सूक्ष्म सिंचनाचे महत्त्व स्पष्ट केले.

## अनिल गलांडे व सचिन साखरे झुंजार पत्रकार संघात




**केज! प्रतिनिधी :** केज येथील झुंजार पत्रकार संघ हा अल्पावधीत नावारुपास आलेल्या संघ आहे , झुंजार पत्रकार संघामध्ये दै.तरुण भारत चे केज तालुका प्रतिनिधी अनिल गलांडे आणि सचिन साखरे यांची झुंजार पत्रकार संघात निवड करण्यात आली आहे.

पत्रकारितेच्या क्षेत्रातील त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान, सामाजिक बांधिलकी विचारात घेऊन झुंजार पत्रकार संघाचे ज्येष्ठ सतीश केजकर ,व महादेव दळवे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल बोलताना वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "दोन्ही नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या अनुभवाचा फायदा झुंजार पत्रकार संघास मजबूत करण्यासाठी आणि पत्रकारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी निश्चितच होईल."

आपल्या निवडीनंतर अनिल गलांडे व सचिन साखरे यांनी झुंजार पत्रकार संघाचे आभार मानले. "पत्रकारांच्या न्याय्य हक्कासाठी लढा देणे आणि पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध राहणे हेच आमचे प्राथमिक ध्येय असेल," असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

या निवडीचे वृत्त समजताच पत्रकारिता, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून अनिल गलांडे आणि सचिन साखरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी झुंजार पत्रकार संघाचे वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी संस्थापक अध्यक्ष दशरथ चवरे,सचिव रमेश इतापे, जेष्ठ पत्रकार सतीश केजकर,महादेव दळवे, विनायक ठोंबरे, दत्तात्रय हंडिबाग, नंदकुमार मोरे, दिनकर राऊत मुबशीर खतीब, दादासाहेब आगे, आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

# DYSP वेंकटराम पथकाचा पहाटे जुगाऱ्यांना दणका !

## 14 जुगारी ताब्यात; 4 लाख 22 हजार 170 रुपयांचा मुद्देमाल जप्त

बीड (प्रतिनिधी)बीड शहरातील अवैध धंद्यांविरोधात DYSP वेंकटराम यांच्या पथकाने कारवाईचा धडाका सुरूच ठेवला आहे.हिरालाल चौक परिसरातील पांडे गल्ली येथे सुरू असलेल्या पत्त्यांच्या जुगार अड्ड्यावर दिनांक 21 सप्टेंबर सोमवार रोजी पहाटे छापा टाकून पोलिसांनी तब्बल 14 जणांना ताब्यात घेत त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या कारवाईत रोख रक्कम, जुगाराचे साहित्य व इतर साहित्य असा एकूण 4 लाख 22 हजार 170 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शहरातील हिरालाल चौक पांडे गल्ली,बीड परिसरातील एका ठिकाणी काही इसम पत्त्यांवर पैशांची हार-जीत लावून जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करून DYSP वेंकटराम यांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा मारला.



या कारवाईमध्ये रोख रक्कम, पत्ते आणि जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण ₹4,22,170 किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 0295/2026 नुसार महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, 1887 मधील कलम 4 व 5 अन्वये 14 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

अवैध धंद्यांविरोधात पथकाची मोहीम सुरूच.

डीवायएसपी वेंकटराम यांच्या पथकाकडून मागील काही महिन्यांपासून जुगार अड्डे, विनापरवाना वाळू वाहतूक व साठा यांसह विविध अवैध धंद्यांविरोधात सातत्याने कारवाया करण्यात येत आहेत. यापूर्वी शिवाजी नगर,पेठ बीड सह बीड बायपास रोडवरील संभाजी राजे चौक परिसरातील एका शेताजवळील घरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावरही कारवाई करण्यात आली होती.

शहरातील जुगार आणि इतर अवैध धंद्यांविरोधातील कारवाई अधिक तीव्र करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. कारवाईनंतर पुन्हा त्याच ठिकाणी अवैध धंदे सुरू होणार नाहीत, यासाठी पोलिसांनी सातत्याने कारवाया कराव्यात तसेच बीड शहर, ग्रामीण व जिल्ह्यातील "परवानाच्या" नावाखाली, नियमाची पायमल्ली करणाऱ्या व रात्रंनदिवस चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर देखील कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि डीवायएसपी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत PSI सय्यद, पोलीस हवालदार राहुल शिंदे, अशोक दराडे तसेच पोलीस अंमलदार अविनाश सानप, कुलदीप औसरमल, शशिकांत ढाकणे आणि विशाल जगताप सहभागी झाले.

## हरिहर तीर्थ कोरडे... आता गणेशमूर्तींचे विसर्जन कसे करायचे? भक्तांसमोर प्रश्न



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी :**

श्री गणेश विसर्जनाला अवघे पाच दिवस शिल्लक असताना ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथ मंदिराच्या पाठीमागील पुरातन श्री हरिहर तीर्थ कोरडे ठाक पडले आहे. त्यामुळे यंदा मोठ्या गणेशमूर्तीसह घराघरांत प्रतिष्ठापना केलेल्या गणेशमूर्तींचे विसर्जन कसे करायचे, असा प्रश्न गणेशभक्तांसमोर निर्माण झाला आहे. गणेश विसर्जनासाठी प्रशासनाने तातडीने योग्य, सुरक्षित आणि पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.

परळी शहरात यंदा विविध गणेश मंडळांनी मोठ्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली आहे. त्याचबरोबर असंख्य नागरिकांनी आपल्या घरांमध्येही गणरायाची स्थापना केली आहे. गणेश विसर्जनाच्या दिवशी या लहान-मोठ्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी योग्य ठिकाणी पाण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. मात्र, हरिहर तीर्थातच पाणी नसल्याने गणेशभक्तांसमोर विसर्जनाचा प्रश्न उभा राहिला आहे. "हरिहर तीर्थात पाणी नसल्यामुळे मोठ्या गणेशमूर्तीसह घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन कसे करायचे, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गणेशभक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने विसर्जनासाठी तातडीने सुरक्षित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक पर्यायी व्यवस्था करावी," अशी मागणी ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.

पावसाचे पाणी हरिहर तीर्थाकडे वळविण्याची मागणी

मागील काही दिवसांपासून परळी शहर परिसरात पावसाला सुरुवात झाली आहे. डोंगरदऱ्यांतून वाहून जाणारे पावसाचे पाणी योग्य पद्धतीने हरिहर तीर्थाकडे वळविल्यास त्यात पाणीसाठा होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने उपलब्ध वेळेचा विचार करून याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणीही ॲड. संकाये यांनी केली आहे.

विसर्जनासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करा

गणेश विसर्जनासाठी आता अवघे काही दिवस शिल्लक असल्याने प्रशासनाने विलंब न करता विसर्जनस्थळ निश्चित करावे. तेथे पुरेसे पाणी, सुरक्षा व्यवस्था, प्रकाशयोजना तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे. हरिहर तीर्थाचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन भविष्यात येथे कायमस्वरूपी पाणीसाठ्याची व्यवस्था करण्याबरोबरच यंदाच्या गणेश विसर्जनाचा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी आग्रही मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.

## सावरकर महाविद्यालयात आज 'ॲकॅडमीक बँक ऑफ क्रेडिट' कार्यशाळा

बीड (प्रतिनिधी) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड यांचे संयुक्त विद्यमाने आज दि. 22 सप्टेंबर रोजी बीडमध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.पीएम उषा प्रकल्पांतर्गत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील विद्यार्थी केंद्रित व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी 'अकॅडमी बँक ऑफ क्रेडिट' आणि 'मल्टिपल एंट्री मल्टिपल एक्झिट' या संकल्पनावर प्राचार्य व कर्मचाऱ्यांना प्राचार्य संजय चाकणे, प्रोफेसर विलास खंदारे हे मार्गदर्शन करणार आहेत. उदघाटनाला भाशिप्र संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलूरकर, महाविद्यालय समिती अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे यांची उपस्थिती राहणार आहे. तर समारोप सत्राला संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष डॉ.पी.के. कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे हे उपस्थीत राहणार आहेत. या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रकल्प समन्वयक डॉ. सय्यद अझरुद्दीन, प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले आहे.

# दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जलस्रोत वाचवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जगताप यांची न.प.कडे मागणी

**किल्ले धारूर, :** किल्ले धारूर शहरात आगामी शुक्रवारी (२५ सप्टेंबर) होणाऱ्या गणेशमूर्ती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पाणी प्रदूषण टाळण्यासाठी नगर परिषदेने तातडीने कृत्रिम विसर्जन तलाव उभारावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जगताप यांनी केली आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण करणे अत्यंत गरजेचे असल्याने ही सुविधा उपलब्ध करून देण्याची विनंती त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

सूर्यकांत जगताप यांनी नगर परिषदेच्या नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना सादर केलेल्या अर्जात नमूद केले आहे की, शहरात सध्या तीव्र पाण्याचा तुटवडा असून नैसर्गिक जलस्रोतांमधील पाण्याची पातळी घटली आहे. अशा परिस्थितीत मूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्रोतांमध्ये झाल्यास पाणी दूषित होऊन नागरिक, जनावरे आणि स्थानिक पर्यावरणावर गंभीर विपरीत परिणाम होऊ शकतात.



"नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी सर्व गणेश मंडळांना आणि गणेशभक्तांना सुरक्षित विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची सुविधा मिळणे आवश्यक आहे. यासोबतच प्रशासनाने जलप्रदूषण टाळण्याबाबत गणेश मंडळांमध्ये लेखी सूचना देऊन जनजागृती करावी," असे प्रतिपादन सूर्यकांत जगताप यांनी आपल्या अर्जात केले आहे.

किल्ले धारूर येथे दुष्काळी परिस्थिती असल्याने पाण्याचे व्यवस्थापन हा अत्यंत संवेदनशील विषय बनला आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या शहरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो आणि मोठ्या संख्येने मूर्तींचे विसर्जन केले जाते. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व उपलब्ध पाण्याचे संवर्धन करण्यासाठी कृत्रिम तलाव उभारण्याचा निर्णय तातडीने घेणे गरजेचे असल्याचे अर्जात नमूद केले आहे. दरम्यान, प्रस्तावित कृत्रिम विसर्जन तलावाच्या ठिकाणी प्रशासनाने पुरेशी प्रकाशयोजना, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, स्वयंसेवक तसेच विसर्जनानंतर मूर्ती व निर्माल्य व्यवस्थापनाची योग्य सोय उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

## आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत कार्तिकी मिसाळ हिची निवड झाल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठान कडून सन्मानित



**बीड (प्रतिनिधी ) :**ब्राझील येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी ' वर्ल्ड स्कूल गेम्स 2026' ची राष्ट्रीय तायक्वांदो पदक विजेती,

राज्यातील एकमेव महिला खेळाडू, पोद्दार इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी कु. कार्तिकी संदीप मिसाळ हिची मुलींच्या 68 किलो वरील वजन गटामध्ये भारतीय संघात निवड झाल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने दि. 19 सप्टेंबर 2026 शनिवार रोजी तिचा सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब जायभाये यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला.यावेळी पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, लक्ष्मण चाटे, बाजीराव ढाकणे, कुंडलिक पालवे, गोरखनाथ मिसाळ, कार्तिकीचे पालक सौ. शितल मिसाळ व श्री संदीप मिसाळ आदींची उपस्थिती होती.

**सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अजिंक्य शिराळे मातृभूमी प्रतिष्ठान कडून सन्मानित बीड(प्रतिनिधी) :** मोरया सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने सालाबादप्रमाणे याही वर्षी जिल्ह्यातील सर्वात उंच 19 वा भगवाधारी गणेश मूर्तीची स्व:खर्चाने स्थापन करून रक्तदानासह, विविध सामाजिक उपक्रम राबवीत असल्याबद्दल मोरया सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अजिंक्य भैय्या शिराळे यांचा मित्रनगर चौक येथे दि. 20 सप्टेंबर 2026 रविवार रोजी मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी त्यांचा पुष्पगुच्छ,सन्मानपत्र देऊन समाज रत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला.यावेळी पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, संदीप उबाळे, अशोक शेजवळ,भगवान जाधव दिनेश ठेंगे,लक्ष्मण चाटे आदींची उपस्थिती होती.

# अमली पदार्थांच्या विळख्यातून बीडला मुक्त करणार; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा कठोर पवित्रा!

**बीड, दि. 21 (जिमाका):** जिल्ह्यात अमली पदार्थांच्या वाढत्या वापराला आळा घालण्यासाठी आणि क्षेत्रीय स्तरावरील ही समस्या समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अमली पदार्थ प्रतिबंधात्मक समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय यंत्रणेला अमली पदार्थांच्या विरोधात 100 टक्के कडक कारवाया करण्याचे आदेश दिले असून, व्यसनमुक्तीसाठी संबंधित यंत्रणेने आता पूर्णपणे 'ॲक्शन मोड'वर येणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले.

बैठकीच्या सुरुवातीला बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी 'कोटपा' (COTPA) कायद्यांतर्गत जिल्ह्यात जास्तीत जास्त कारवाया करून अमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्याच्या सूचना दिल्या. विशेषतः माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवण्यावर भर देण्यात




*** कठोर कारवायांचे आदेश:** शाळा आणि महाविद्यालयीन परिसरामध्ये अमली पदार्थांच्या विरोधात 100 टक्के कडक कारवाया करण्याचे यंत्रणेला स्पष्ट निर्देश.

*** COTPA अंतर्गत कारवाई:** कोटपा (COTPA) कायद्याचे कठोर पालन करून जास्तीत जास्त तंबाखूजन्य व अमली पदार्थ जप्त करण्यावर भर.

*** शैक्षणिक संस्थांचा सहभाग:** शासन निर्णयानुसार मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुखांवर अमली पदार्थ विरोधी कारवायांची मोठी जबाबदारी.

*** जनजागृती आणि ॲक्शन मोड:** शाळांमध्ये विशेष जनजागृती मोहीम राबवून संशयितांवर व समाजकंटकांवर कायदेशीर बडगा उगारण्याचे निर्देश.

यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

मुख्याध्यापक आणि शिक्षणाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची शासन निर्णयाचा संदर्भ देत जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, 10 जुलै 2023 च्या आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व केंद्रप्रमुख, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी आणि मुख्याध्यापकांना अमली पदार्थ तसेच तंबाखू विरोधी कारवाया करण्याचे अधिकार व सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता केवळ प्रशासनावर भिस्त न ठेवता, मुख्याध्यापकांनीदेखील या समाजसुधारणेच्या कामात हिरिरीने पुढे यावे. विद्यार्थ्यांना व्यसनाधीन बनवणाऱ्या प्रत्येक समाजकंटकाविरुद्ध एकजूट होऊन सक्त कायदेशीर कारवाया करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

अमली पदार्थांचे सेवन तरुण पिढीला उद्ध्वस्त करत असून, याला वेळीच वेसण घालण्यासाठी पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग आणि आरोग्य विभागाने समन्वय साधून संयुक्त मोहीम राबवावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या बैठकीत केले.

## सण-उत्सवाच्या ट्रॅव्हल्सचालकांची दरोडेखोरी; बीडमधून पुणे, मुंबईचे भाडे दुप्पट

बीड, ता. २१ : मी पुण्यात एका खासगी कंपनीत जेमतेम दहा हजारांची नोकरी करतो. वर्षभर हाडाची काडं करून सणाला बायको-पोरांना घेऊन गावी, आपल्या बीडला जायचं म्हणजे आमच्यासाठी एक मोठा आनंदाचा क्षण असतो. पण, हाच आनंद आता या ट्रॅव्हल्सवाल्यांनी अक्षरशः हिरावून घेतलाय. काल मी तिकीट काढायला गेलो, तर नेहमी जे ५०० रुपयांचे तिकीट असते, ते थेट १२०० रुपये सांगण्यात आले. कुटुंबातील चार माणसांचे नुसते जाण्याचे पाच हजार रुपये लागतील. एवढे पैसे कुठून आणायचे? एसटी बसमध्ये पाय ठेवायला जागा नसते, एसटीचे बुकिंग महिनाभर आधीच फुल्ल झालेले असते. याचाच थेट गैरफायदा हे खासगी ट्रॅव्हल्सवाले घेतात. पैसे द्या, नाहीतर दुसरी गाडी बघा, अशी उद्धट उत्तरे त्यांच्या एजंटकडून ऐकावी लागतात. सणाला घरी जाऊन चार घास सुखाचे खावे, तर प्रवासातच आमचं दिवाळं निघतंय. गोरगरिबांनी सण साजरे करायचेच नाहीत का? मायबाप सरकार आणि अधिकारी या उघड लुटीवर गप्प का आहेत? ही अत्यंत प्रातिनिधिक आणि विदारक व्यथा आहे, बीड जिल्ह्यातून कामानिमित्त पुण्या-मुंबईत गेलेल्या हजारो सामान्य चाकरमान्यांची! सण-उत्सवाच्या तोंडावर ट्रॅव्हल्स चालकांच्या या दरोडेखोरीमुळे सर्वसामान्यांचे डोळे पाणावले आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# उत्सर्जनाचे विषम वास्तव

भारताने गेल्या काही काळापासून जागतिक मुद्यांवर स्वतंत्र आणि ठाम भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. दिल्लीमध्ये नुकत्याच झालेल्या 'पर्यावरण आणि हवामान गतिशीलतेचे भविष्य' या विषयावरील परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्बन उत्सर्जनावरून बड्या राष्ट्रांना खडे बोल सुनावले. खरे तर, जागतिक हवामान बदल हे आता भविष्यातील संकट राहिलेले नाही. वाढते तापमान, उष्णतेच्या लाटा, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर आणि समुद्राच्या पातळीतील वाढीचे परिणाम सगळे जग अनुभवत आहे. नेपाळमध्ये महापुरामुळे नुकताच मोठा हाहाकार उडाला. जगभरात तापमानवाढीमुळे येणाऱ्या अशा संकटाच्या केंद्रस्थानी कार्बन उत्सर्जन हेच प्रमुख कारण आहे. त्यामुळे प्रत्येक देशाने उत्सर्जन कमी करण्याची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. पण, एकविसाव्या शतकातील पहिल्या पंचवीस वर्षांच्या कालखंडाकडे पाहिले, तर जगाचा राखणदार म्हणवणाऱ्या अमेरिकेसह बहुतांश विकसित देश या संदर्भातील आपली जबाबदारी गांभीर्याने पार पाडत नसल्याचेच दिसून येते. नेमक्या याच विसंगतीकडे लक्ष वेधत पंतप्रधानांनी विकसित देशांच्या डोळ्यात अंजन घातले आहे. हवामान परिषदेत पंतप्रधान म्हणाले की, विकसित देशांचे दरडोई कार्बन उत्सर्जन भारताच्या तुलनेत पाच ते सहापट जास्त आहे. मात्र, हवामान बदलाच्या दुष्परिणामांसाठी बहुतांश वेळा विकसनशील देशांनाच जबाबदार धरले जाते. हे केवळ अनुचितच नाही, तर अन्यायकारक आहे.

पंतप्रधानांच्या या विधानाच्या संदर्भात कार्बन उत्सर्जनाबाबतची जगभरातील स्थिती आणि ते कमी करण्यासाठी भारताकडून होत असलेले प्रयत्न यावर एक दृष्टिक्षेप टाकावा लागेल. जागतिक हवामान बदलावरील उपाययोजनां संदर्भात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पॅरिस परिषदेने निश्चित केलेल्या बांधिलकीची पूर्तता करणारा भारत हा 'जी-२०' समूहातील एकमेव देश आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी केलेली स्पष्टोक्ती विकसित देशांच्या दांभिकपणावर प्रहार करणारी आहेच. शिवाय, भारताने गेल्या दहा-बारा वर्षांत कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी, तसेच पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने केलेल्या सर्वंकष उपाययोजनांचे महत्त्वही अधोरेखित करणारे आहे. जगातील एकूण कार्बन उत्सर्जनाचा विचार करता, अमेरिका आणि चीननंतर भारताचा क्रमांक येतो. मात्र, या चित्राची दुसरी बाजू अधिक महत्त्वाची आहे. २०२४ मध्ये भारताचे दरडोई कार्बन उत्सर्जन सुमारे ०.६ टन होते. त्याचवेळी अमेरिकेचे ३.९, तर चीनचे २.४ टन इतके होते. म्हणजे भारताचे एकूण उत्सर्जन अधिक असले, तरी दरडोई उत्सर्जन विकसित देशांच्या तुलनेत लक्षणीय कमी आहे. यामागे भारताची लोकसंख्या आणि वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ही दोन प्रमुख कारणे आहेत. परिणामी भारताला आजही वीज, उद्योग, वाहतूक, घरे आणि पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर ऊर्जेची आवश्यकता आहे. त्यामुळे 'कार्बन उत्सर्जन तातडीने शून्यावर आणा' अशी सक्ती भारताच्या आर्थिक विकासावर परिणाम करू शकते. तथापि, भारताने हवामान बदलाचे आणि कार्बन उत्सर्जन घटवण्याचे आव्हान नाकारलेले नाही. उलट, गेल्या दशकात अक्षय ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार, सौरऊर्जा, पवनऊर्जा, ऊर्जा कार्यक्षमता, एलईडी बल्ब आणि इलेक्ट्रिक वाहने वापराला प्रोत्साहन, जैवइंधनाचा उपयोग, ग्रीन एनर्जी कॉरिडॉर आणि आंतरराष्ट्रीय सौरऊर्जा सहकार्य अशा अनेक माध्यमांतून भारताने या आव्हानावर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. अक्षय ऊर्जेचा विस्तार आणि कोळशापासून होणारी वीज निर्मिती घटल्यामुळे २०२५ मध्ये भारताच्या वीज क्षेत्रातील कार्बन उत्सर्जनात ३.३ टक्के घट झाली. मात्र, हे करताना भारताने आंतरराष्ट्रीय मंचावरून आपली बांधिलकीही सुस्पष्टपणे मांडली. २०२१ च्या ग्लासगो परिषदेत भारताने 'पंचामृत'ची संकल्पना मांडली. २०७० पर्यंत नेट-झीरो अर्थात कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याचे लक्ष्य जाहीर केले. शिवाय, ५०० गिगावॅट जीवाश्मेतर ऊर्जा क्षमता आणि उत्सर्जन तीव्रता कमी करण्याचे उद्दिष्टही निश्चित केले. आता भारताने २०३१ ते ३५ या कालावधीसाठी नवे ध्येय समोर ठेवले आहे. त्यानुसार, २०३५ पर्यंत उत्सर्जनाची तीव्रता ४७ टक्क्यांनी कमी करणे, वीजनिर्मिती क्षमतेपैकी ६० टक्के क्षमता जीवाश्मेतर स्रोतांमधून निर्माण करणे आणि वनक्षेत्र तसेच वनाच्छादनातून ३.५ ते ४ अब्ज टन कार्बन डाय ऑक्साईड समतुल्य कार्बन सिंक निर्माण करणे आदी गोष्टींचा समावेश आहे.

हवामान बदलासंदर्भातील भारताची ही भूमिका केवळ 'आम्हीही उत्सर्जन कमी करू' एवढीच मर्यादित नाही. भारत सातत्याने हवामानविषयक समान न्याय, स्वतंत्र दायित्व आणि अन्य देशांवर ऐतिहासिक म्हणजेच वारशाने आलेली उत्सर्जनाची जबाबदारी या मुद्यांवर भर देत आला आहे. दुसरीकडे, नेमक्या याच मुद्यांवर अमेरिकेसारख्या विकसित देशांच्या वर्तन-व्यवहारात मात्र कमालीची विसंगती आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या पहिल्या काळात अमेरिकेने पॅरिस करारातून बाहेर पडण्याची प्रक्रिया सुरू केली आणि ४ नोव्हेंबर २०२० ला ती अमलात आली. पुढे जो बायडेन सत्तेवर आल्यानंतर अमेरिकेने २०२१ मध्ये परत एकदा या करारात प्रवेश केला. बायडेन यांच्यानंतर ट्रम्प पुन्हा सत्तेत आले आणि गेल्या वर्षी अमेरिकेने दुसऱ्यांदा या करारातून माघारीची प्रक्रिया सुरू केली. अमेरिकेचे आर्थिक हित, ऊर्जा सुरक्षा आणि राष्ट्रीय सार्वभौमत्व अशी कारणे देत अखेर यंदाच्या २७ जानेवारीला अमेरिका पॅरिस करारातून बाहेर पडली. म्हणजे एका अर्थाने, कार्बन उत्सर्जन घटवण्याच्या जागतिक प्रयत्नांकडे अमेरिका तसेच काही युरोपियन देशांनी पाठ फिरवली. मात्र, त्याचवेळी आपल्या देशापुरती आणि स्वतःच्या सोयीची भूमिका घेतली. त्यामुळे २००५ ते २०२२ दरम्यान अमेरिकेचे हरितगृह वायू उत्सर्जन १७ टक्क्यांनी कमी झाले. युरोपियन युनियननेही वीज क्षेत्रातील उत्सर्जन बरेच कमी केले. पण, याला दुसरी बाजूही आहे. २०२५ मध्ये जगभरात पुन्हा वीज निर्मितीशी संबंधित कार्बन उत्सर्जनाचा उच्चांक झाला. विकसित देशांचे कार्बन उत्सर्जन ०.५ टक्क्यांनी, तर विकसनशील देशांकडून होणारे उत्सर्जन तुलनेने कमी म्हणजे ०.३ टक्क्यांनी वाढले. अनेक प्रयत्नांनंतरही जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व पूर्णपणे संपलेले नाही. या स्थितीमध्ये विकसित देशांच्या भूमिकेविषयी प्रश्न उपस्थित होतो. औद्योगिक क्रांतीपासून आजपर्यंतच्या आर्थिक विकासाचा मोठा भाग कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायूवर आधारित होता. त्या काळातील प्रचंड उत्सर्जनामुळे आज वातावरणातील कार्बनचे प्रमाण वाढले आहे. हे ऐतिहासिक वास्तव नाकारून वर्तमानात विकासाच्या वाटेवर निघालेल्या भारतासारख्या देशांना मात्र उत्सर्जन कमी करण्याचा उफराटा सल्ला दिला जातो. वातावरणाच्या सुरक्षिततेची किंमत विकसनशील देशांनीच का मोजावी, ही भारताची भूमिका आहे. प्रश्न केवळ 'कोण किती कार्बन उत्सर्जन करतो?' असा नाही. प्रश्न आहे, कोणी किती काळ कार्बन उत्सर्जन केले? त्यातून कोणाचा विकास झाला? आज त्याची किंमत कोण मोजतो आहे? आणि यातून उद्भवणाऱ्या संकटाच्या निवारणासाठी पैसा तसेच तंत्रज्ञान कोण उपलब्ध करून देणार? भारताला कार्बन उत्सर्जनाबाबत सूट मिळावी, असा या प्रश्नांचा अर्थ नाही. भारतासह प्रत्येक देशानेच आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. पण, या जबाबदारीचे वाटप ऐतिहासिक योगदान, दरडोई उत्सर्जन, आर्थिक क्षमता आणि विकासाच्या गरजा यांचा विचार करून व्हायला हवे. वातावरणातील विषारी वायूंचे उत्सर्जन रोखायचे असेल, तर त्यासाठीच्या दायित्वातील विषमताही संपली पाहिजे. ■

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# महाशक्तींनी खंजीर उपसला!

**पीठ पिछे वार करना तो उनकी फितरत थी!**
**हम ही नासमझ थे जो उन्हें गले लगाते रहे!!**

१६ सप्टेंबर २०२६ या एकाच दिवशी वॉशिंग्टन व इस्लामाबाद या दोन राजधान्यांमध्ये घडलेला घटनाक्रम पाहिल्यावर हा उर्दू शेर म्हणावासा वाटतो. नवी दिल्लीत झालेल्या ब्रिक्स घोषणापत्राची शाई वाळण्यापूर्वीच अमेरिका व चीन दोन्ही देशांनी भारताच्या विरोधात खंजीर उपसला.

ब्रिक्स संमेलनाच्या यशानंतर अमेरिका, भारताच्या विरोधात काही निर्णय घेईल हे तर अपेक्षित होतेच, पण चीन? ब्रिक्स संमेलनात सहभागी होऊन मायदेशी परतताच चिनी राष्ट्रपती शी जिन पिंग यांनी भारताच्या विरोधात भूमिका घेण्यास आपल्या परराष्ट्र मंत्रालयाला परवानगी दिली.

**गद्दारीचा इतिहास :** देशाचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू व चिनी पंतप्रधान चौ एन लाय यांनी 'हिंदी-चिनी भाई भाई' ही प्रसिद्ध घोषणा दिल्यानंतर, चीनने भारतावर आक्रमण करून गद्दारी केली. अटलबिहारी वाजपेयींनी लाहोर बस यात्रा केल्यावर पाकिस्तानने याचे उत्तर कारगिल घुसखोरीने दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला भेट दिल्यावर, पाकिस्तानने पठाणकोट केले. मोदी सरकारने चीन, पाकिस्तान दोन्ही देशांशी संबंध सुधारण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्यानंतर दोन्ही देशांनी याचे उत्तर गद्दारीने दिले आहे.

**अपेक्षित अमेरिका :** रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्के टेरिफ म्हणजे आयात शुल्क लावण्याची तरतूद असणारे विधेयक अमेरिकन काँग्रेसच्या विचाराधीन होते. ब्रिक्सनंतर हे विधेयक 'फास्ट ट्रॅक'वर टाकण्यात आले. म्हणजे त्यावर मतदान तातडीने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आणि १६ सप्टेंबर रोजी २६२ विरुद्ध १५९ अशा बहुमताने ते पारित करण्यात आले. अमेरिकन सिनेटमध्ये हे विधेयक यापूर्वीच ८६ विरुद्ध ११ अशा बहुमताने पारित करण्यात आले आहे. मतदानाचे हे आकडे पाहता रिपब्लिकन व डेमोक्रॅट्स दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी विधेयकाला पाठिंबा दिला असल्याचे दिसते. रशिया अ‍ॅण्ड इराण अ‍ॅक्ट २०२६ या नावाने ओळखला जाणारा हा कायदा लिंडसे ग्रॅहम यांच्या नावाने ओळखला जाणार आहे. कारण या विधेयकाचा प्रस्ताव ग्रॅहम यांनी सर्वप्रथम मांडला होता. मधल्या काळात ग्रॅहम यांचे अचानक निधन झाल्याने या कायद्याला त्यांचे नाव देण्यात आले. राष्ट्रपती ट्रम्प यांनी सही केल्यानंतर लगेच तो अंमलात येईल.

**१०० टक्के शुल्क :** रशियाकडून कच्चे तेल आयात करणाऱ्या देशांवर १०० टक्के आयात शुल्क लावण्याची तरतूद विधेयकात करण्यात आली आहे. याचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर किती व कसा परिणाम होईल हे येणाऱ्या काळात दिसणार आहे. याशिवाय राष्ट्रपती पुटिन, क्रेमलिनमधील त्यांचे अधिकारी व रशियन बँका यांची खाती गोठविण्याची तरतूद यात करण्यात आली आहे. रशिया काही पळवाटांनी आपले कच्चे तेल विकत होता. त्या पळवाटाही बंद करण्याची तरतूद या ६१ पृष्ठांच्या कायद्यात करण्यात आली आहे.

**ब्रिक्सची प्रतिक्रिया :** ब्रिक्स संमेलनात अमेरिकेचा उल्लेख करण्यात आला नसला तरी या संमेलनाचा सूर अमेरिकेच्या विरोधात आहे हे अमेरिकेच्या लक्षात आले होते आणि त्याची प्रतिक्रिया लवकर उमटेल हे भारतालाही अपेक्षित होते. राष्ट्रपती ट्रम्प यांनी अपेक्षित असाच निर्णय घेतला आहे. ब्रिक्स देश डॉलरच्या वर्चस्वाला धक्का लावण्याचा प्रयत्न करीत आहेत असेही ट्रम्प यांना वाटत होते. भारताने याचा इन्कार केला असला तरी त्याचा फार उपयोग झाला नाही.

**आणि चीन :** ब्रिक्सच्या निमित्ताने भारत-चीन संबंधाचा नवा अध्याय सुरू झाला असल्याचे मानले जात होते. गल्वानच्या रक्तरंजित संघर्षानंतर भारत-चीन संबंध कमालीचे तणावाचे झाले होते. तो तणाव बराचसा निवळला होता. भारताने यासाठी अथक परिश्रम घेतले होते. तरी ऑपरेशन सिंदूरमध्ये चीनने पाकिस्तानला मदत करीत भारताला अस्वस्थ केले होते. यानंतरही भारताने आपला संयम कायम ठेवीत चीनसोबत आपले संबंध सुधारण्याची प्रक्रिया व प्रयत्न कायम ठेवले होते. चिनी राष्ट्रपती ब्रिक्स संमेलनासाठी भारतात आल्याने भारतही सुखावला होता. पण, १६ सप्टेंबर रोजी चीनने पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये जे काही केले ते धक्कादायक होते.

**नवी कुरापत :** चीन-पाकिस्तान यांनी संयुक्तपणे स्थापन केलेल्या सीमा आयोगाची पहिली बैठक १६ सप्टेंबर रोजी इस्लामाबादमध्ये पार पडली. चिनी परराष्ट्र मंत्रालयातील अधिकारी लि या व पाकिस्तानचे अधिकारी बिलाल मोहम्मद चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पहिल्या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यातील सर्व निर्णय सरळसरळ भारताच्या विरोधात आहेत.

**शाक्सगम खोरे :** १९६३ मध्ये पाकिस्तानने आपल्या ताब्यातील काश्मीरचा काही भाग चीनला भेट म्हणून दिल्यानंतर पाकिस्तान-चीन सीमा अस्तित्वात आली. हा भाग शाक्सगम खोरे म्हणून ओळखला जातो. पूर्व काराकोरम पर्वतरांगांना लागून असलेले हे खोरे अविभाजित जम्मू-काश्मीरचा भाग होते. मात्र, १९४७ च्या विभाजनानंतर एक तृतीयांश काश्मीर पाकिस्तानात गेले, जो आज व्याप्त काश्मीर म्हणून ओळखला जातो. लष्करीदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा व मोक्याचा असलेला हा भाग पाकिस्तानने १९६३ मध्ये एका करारानुसार चीनला 'भेट' दिला. शाक्सगम खोऱ्याच्या एका बाजूला चीनचा शीन जियांग उग्वार हा प्रदेश आहे तर दुसरीकडे व्याक्त काश्मीरचा दक्षिण-पश्चिम भाग आहे. यातून चीन-पाकिस्तान यांच्यात अनधिकृत सीमा तयार झाली आहे.

**सियाचीन ग्लेशियर :** शाक्सगम खोरे सियाचीन ग्लेशियरला लागून आहे. सियाचीन ग्लेशियरमध्ये मानवी वसाहत करणे शक्य नसले तरी हा भाग भारताच्या सुरक्षेसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने 'ऑपरेशन मेघदूत' करीत सियाचीन ग्लेशियरवर आपला निर्विवाद ताबा स्थापित केला. सियाचीन ग्लेशियवरवर आपला ताबा कायम ठेवण्यासाठी भारताला दररोज ५ ते ६ कोटी रुपये खर्च येतो आणि ४२ वर्षांपासून भारत हे करीत आहे. म्हणजे भारताने सियाचीन ग्लेशियरच्या सुरक्षेसाठी आजवर जवळपास १ लाख कोटी रुपये एवढा खर्च केला आहे आणि या ग्लेशियवरच चीन-पाकिस्तान दोघांचीही नजर आहे.

**सीमा व्यवस्थापन :** चीन-पाकिस्तान यांच्यात १९६३ साली अस्तित्वात आलेल्या अनधिकृत, अवैध सीमेचा सर्व्हे, संयुक्त व्यवस्थापन, व्यापाराचे मार्ग यावर विचार करण्यासाठी चीन-पाकिस्तान यांनी एक सीमा आयोग नेमला आणि त्याचे कामकाज १६ सप्टेंबरपासून सुरू करण्यात आले. भारताच्या परराष्ट्र प्रवक्त्याने याबाबत फार कडक भूमिका घेतली आहे. भारताची भूमिका अतिशय योग्य आहे, पण चीनच्या भूमिकेचे काय? चीनने पुन्हा एकदा भारताच्या पाठीत खंजीर खुपसला आहे असेच म्हणावे लागेल. याने दोन्ही देशांतील संबंधात तणाव वाढणार नसला तरी त्यात कडवटपणा मात्र येणार आहे आणि विशेष म्हणजे हे सारे ब्रिक्स संमेलनानंतर लगेच करण्यात आले.

**महाशक्ती विरोधात :** चीन-पाकिस्तान यांच्या या निर्णयाने भारताला नजीकच्या काळात काही धोका नसला तरी चीनने पुन्हा एकदा भारतविरोधी व पाकिस्तानला अनुकूल असा संदेश दिला आहे. जगातील दोन महाशक्ती, अमेरिका आणि चीन यांनी एकाच दिवशी भारतविरोधी निर्णय घेत भारताच्या विरोधात खंजीर उपसला आहे हे निश्चित. ■

## वेध

नीलेश जोशी

# हिंदू सण, उत्सव आणि पर्यावरण

**द्यौः शान्तिरन्तरिक्षं शान्तिः। पृथिवी शान्तिरापः शान्तिः।**
**ओषधयः शान्तिः। वनस्पतयः शान्तिः।।**

हा शुक्ल यजुर्वेद, वाजसनेयी संहिता ३६.१७ मधील शांतिमंत्र आहे. यात आकाश, अंतरिक्ष, पृथ्वी, जल, औषधी आणि वनस्पतींसाठी शांतीची प्रार्थना केली आहे. या प्रार्थनेत मानवाचे कल्याण निसर्गापासून वेगळे मानलेले नाही. पृथ्वी, जल, औषधी आणि वनस्पती यांचे संतुलन व कल्याण हेच व्यापक शांततेसाठी आवश्यक आहेत. आजच्या परिभाषेत सांगायचे तर हा मंत्र संतुलित सहजीवनाची भावना व्यक्त करतो. सद्यस्थितीत ज्यावेळी जलसंधारण, वृक्षसंवर्धन, जैवविविधता आणि प्रदूषण नियंत्रण या विषयांची चर्चा होते त्यावेळी हजारो वर्षांपूर्वी आमच्या पूर्वजांचा अभ्यास, दूरदृष्टी किती व्यापक होती याची जाणीव वरील मंत्राचे स्मरण झाल्यावर होते.

पृथ्वीला, नद्यांना माता, वृक्षांना देवतास्वरूप आणि पंचमहाभूतांना जीवनाचे आधार मानणारी आपली संस्कृती माणसाला सृष्टीचा स्वामी नव्हे, तर तिचा घटक मानते. हिंदू जीवन पद्धतीतील हीच सर्वसमावेशकता तिचे वैशिष्ट्य आहे. भारतीय चिंतनात प्राचीन काळापासून निसर्गाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहेत. यात सकाळी भूमीला स्पर्श करण्यापूर्वी तिची क्षमा मागण्याची भावना असो किंवा नदीस्नानापूर्वी नदीला वंदन करण्याचा प्रघात, यात निसर्गाबद्दल आदराची भावना आहे. खरं म्हणजे 'माझे जीवन निसर्गामुळे आहे' ही जाणीव निर्माण करणे, हेच पर्यावरणसंवर्धनाचे पहिले पाऊल. भारतीय संस्कृतीत वड, पिंपळ, औदुंबर, तुळस, निंब यासह अनेक वृक्ष, वनस्पतींना असलेले विशेष महत्त्व आजही आपण जपतो आहोत. यातील तुळशीवृंदावन हे तर भारतीय घराचे सांस्कृतिक प्रतीकच म्हणावे लागेल. धार्मिक आस्था आणि पर्यावरणीय उपयोगिता यांची सांगड घालणाऱ्या बाबी हजारो वर्षांपासून आमच्या सामाजिक जीवनात सहज रुजल्या आहेत. नद्यांविषयीची भारतीय भावना तर याहूनही व्यापक आहे. गंगा, यमुना, गोदावरी, नर्मदा, कावेरी, कृष्णा यासह त्या-त्या गाव खेड्यातील नदीला माता मानले जाते. जी कृतज्ञता नदीबाबत तीच पशुपक्ष्यांसंदर्भातही दिसून येते. नागपंचमी, गोवर्धनपूजा, वसुबारस, पोळ्यासारखे सण आणि गणेशाचे वाहन मूषक, कार्तिकेयाचे वाहन मोर, विष्णूचे गरुड, शिवाचे नंदी, दुर्गेचे वाहन सिंह अशा प्रतीकात्मक नात्यांमुळे भारतीय परंपरेत प्राणिजगताला मिळालेली सांस्कृतिक प्रतिष्ठा माणूस आणि इतर जीवसृष्टी यांच्यातील संबंध अधोरेखित करतात.

उत्सव म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हे; ते समाजाला एकत्र आणणारे, सामूहिक भावना जागवणारे आणि सामाजिक संदेश पोहोचवणारे माध्यम आहेत. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीला मिळालेले बळ हे गत शतकातील ठळक उदाहरण म्हणावे लागेल. कालौघात सार्वजनिक गणेशोत्सवासह, दहीहंडी, नवरात्र आदी उत्सव काही ठिकाणी काही प्रमाणात दिशाहीन झाल्याचे दिसून येते. त्याचे समर्थन निश्चितच कोणीही करणार नाही. पण त्या आड हिंदू समाजातील सण, उत्सव, परंपरा यावर अनावश्यक चर्चा घडवून हिंदू समाजाला लक्ष्य करणारी कृती कशी सहन करता येईल? एखाद्या प्रथा, परंपरेची वैज्ञानिकता तपासणे चुकीचे नक्कीच नाही. समाजजीवन अधिक सुसंस्कृत, पर्यावरणपूरक आणि विवेकी व्हावे म्हणून सण, उत्सवात शिरलेल्या दोषांविरुद्ध आवाज उठविणे देखील मान्यच आहे. मात्र विरोध करणाऱ्या, आवाज उठविणाऱ्यांचा उद्देश दोषांना दूर करण्याचा आहे की, दोषांच्या आड सनातन संस्कृतीला विरोध करण्याचा याची खातरजमा करणे आवश्यक ठरते. कारण आपल्या पूर्वजांनी हजारो वर्षांपूर्वीपासून रुजविलेली ही जीवनमूल्ये आपली वैशिष्ट्ये आहेत. जलसंधारण, वृक्षसंवर्धन, जैवविविधता, प्रदूषण नियंत्रण या संदर्भात जागतिक स्तरावर चर्चा होत असताना भारतीय संस्कृतीने मात्र हजारो वर्षांपूर्वी या सर्वांचा व्यापक विचार केला. स्वातंत्र्यानंतरच्या काळात दुर्दैवाने दिशाहीन झालेल्या अनेकांच्या डोक्यातील उन्माद सण, उत्सवात दिसून येत असेल तर तो दोष त्या व्यक्ती, समूहाचा म्हणावा लागेल. यात धर्म, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा यांचा यत्किंचितही दोष नाही. अर्थात जे दिशाहीन आहेत त्यांनाही योग्य दिशा देण्याचे काम समाजधुरिणांनी करणे आवश्यक आहे. पण काही उन्माद करणाऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन हिंदू संस्कृती, सण, उत्सवांना ठरवून लक्ष्य केले जात आहे, हे सामान्यजनांनी समजून घ्यावे. ■

९४२२८६२४८४

## कानोसा

डॉ. अमोल पुसदकर

# विकसित भारतासाठी योगदान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ यावर्षी स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्वप्रथम स्वातंत्र्याच्या शंभराव्या वर्षी म्हणजे २०४७ मध्ये विकसित भारत कसा असेल याचे स्वप्न मांडले. २०४७ हे वर्ष भारताच्या स्वातंत्र्याचे शंभरावे वर्ष आहे. १०० वर्षांचा कालावधी एखाद्या देशाला मिळणे, एखाद्या समाजाला विकसित होण्यासाठी मिळणे, ही एक खूप मोठी गोष्ट आहे. प्रत्येक समाजासमोर आणि राष्ट्रासमोर वेगवेगळ्या पद्धतीची आव्हाने नेहमीच असतात. परंतु, त्या आव्हानांवर लक्ष ठेवून त्यावर विजय मिळवण्यासाठी वेगवेगळे उपाय योजत जो समाज पुढे जातो, तो समाज विश्वगुरू पदाला लायक असतो.


भारतीय समाजाचे सुद्धा मूल्यांकन २०४७ च्या दृष्टिकोनातून होणारच आहे. परंतु, त्यासाठी आतापासून जर एक विचार केला गेला की, भविष्यात भारत हा विकसित भारत, विश्वगुरू भारत म्हणून कसा समोर येईल, तर ते देशाच्या, समाजाच्या दृष्टीने फायद्याचे ठरेल. आज आपण बघतो आहे की, समाजासमोर अनेक समस्या उभ्या आहेत. परंतु, त्याचबरोबर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर काही संधी सुद्धा आपल्याकडे येत असतात. उदाहरणार्थ, कोरोना ज्यावेळेला संपूर्ण जगामध्ये पसरला, त्यावेळेला चीनमधील त्याचा उद्‌गम हा जगाला चांगला वाटला नाही. चीनमधील कार्यव्यवस्था आणि त्याच्या जागतिक कुरापती यामुळे अनेक कंपन्यांना असे वाटू लागले की, आपण एखाद्या सुरक्षित भूमीचा शोध आपला उद्योग स्थापन करण्यासाठी केला पाहिजे आणि यालाच अनुसरून जगातील मोठमोठ्या कंपन्यांनी चीनच्या बाहेर व्हिएतनाम, भारत आणि इतरही काही देशांचा विचार सुरू केला. साहजिकच भारताला अनेक कंपन्या प्राधान्य देऊ शकतात, कारण भारत हा फार मोठी भूमी, जलसंपदा आणि मनुष्यबळाचा देश आहे. परंतु, आज नाही उद्या एकदम जर जगातील मोठमोठ्या कंपन्यांनी भारतात आपले उद्योग स्थापित करण्याचे ठरवले, तर ते स्थापित करणे त्यांच्यासाठी फारसे मोठे काम राहणार नाही. भूमी आपल्याजवळ आहे, त्याचबरोबर जल आणि विद्युत या सोयीसुद्धा त्यांना आपण उपलब्ध करून देऊ शकतो. परंतु, कुशल मनुष्यबळाचे काय? हा आपल्याला भेडसावणारा प्रश्न आहे. प्रत्यक्ष उत्पादन करणारी किंवा उत्पादनात सहभाग नोंदविणारी जनसंख्या किती आहे, हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. २०४७ मध्ये भारताला जर विकसित भारत, विश्वगुरू भारत, विकासाचे केंद्र भारत अशा पद्धतीने संपूर्ण जगासमोर मांडायचे असेल, तर विकसित भारताच्या योगदानात तरुणांचा सहभाग आणि महिलांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे, कारण एकूण लोकसंख्येचा महिला व तरुण युवक हा एक मोठा भाग आहे.

आपल्या देशामध्ये तरुणांची संख्या फार मोठी आहे. आज देशामध्ये कोणालाही विचारले की, तुला काय येते, तर तो आपल्याला हे सांगू शकतो की, तो बी. ए. झाला आहे की एम. ए. झाला आहे, म्हणजे त्याने कोणती पदवी घेतली आहे, हे तो सांगतो. पण, त्याला काय येते, याचे उत्तर फार कमी लोकांकडे असते. जोपर्यंत विद्यार्थ्यांजवळ सांगण्यासाठी फक्त डिग्री म्हणजे पदवी असेल, तोपर्यंत त्यांना उद्योगांमध्ये उत्तम संधी मिळणार नाही. परंतु, पदवी प्राप्त करताना कशा पद्धतीची नोकरी किंवा व्यवसाय आपल्याला करायचा आहे, त्याला आवश्यक ते कौशल्य जर त्याने आत्मसात केले, तर त्याच्या नोकरीच्या किंवा व्यवसायामध्ये यशस्वी होण्याच्या त्याच्या संधी वाढतील. तरुणांना कौशल्य आणि संधी या दोन्हीची आवश्यकता आहे, म्हणजे काम करणारे हात हवे आणि ते कार्य उत्तम प्रकारे करणारे कौशल्य सुद्धा त्या हातांमध्ये असणे आवश्यक आहे. उद्योगांमध्ये जे कामगार कार्यरत आहेत, त्यातील जुन्या कामगारांचे कौशल्य पुन्हा एकदा नवीन तंत्रज्ञानाप्रमाणे अद्ययावत करण्याची आवश्यकता असते. उद्योगांची प्रगती नाही झाली, तर देशाची पण प्रगती होणार नाही आणि कामगारांना सुद्धा चांगले दिवस येणार नाहीत, कारण उद्योग तोट्यात आणि कामगार फायद्यात असे चित्र कधीही उभे राहू शकत नाही. आज-काल उद्योगांमध्ये बरेचदा जे प्रशिक्षण दिले जाते, ते केवळ आणि केवळ उद्योगाच्या फायद्याचा विचार करून दिले जाते. परंतु, उद्योगांमध्ये काम करणारा कामगार, त्याला सुद्धा परिवार आहे, मुले आहेत. एक आई-वडील म्हणून त्यांना सुद्धा मुलांच्या भविष्याची चिंता आहे. त्याला सुद्धा निवृत्त झाल्यानंतर स्वतःचे म्हातारपण सन्मानाने घालवता आले पाहिजे. यासाठी आर्थिक नियोजन शिकविणे आवश्यक आहे. हाताला काम, हातामध्ये कौशल्य आणि त्या कामाचा पूर्ण मोबदला मिळणे आवश्यक आहे. अनेक उद्योगांमधील कामे ही धोकादायक स्वरूपाची असतात, त्यामुळे काम करणाऱ्या कामगाराला त्याच्या सुरक्षिततेची हमी सुद्धा मिळणे आवश्यक असते. उद्योगांमध्ये काम करणारा मदतनीस म्हणजे हेल्पर हा सुद्धा काही वर्षांनी कुशल कामगार बनला पाहिजे. कुशल कामगार हा कुशल अधिकारी सुद्धा बनला पाहिजे. यासाठी उद्योगांनाच प्रयत्न करावे लागतील आणि त्यांच्या प्रयत्नांना कामगारांना सुद्धा साथ द्यावी लागेल. आज उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर महिला सुद्धा कामाला जात आहेत. वाढत्या महागाईमध्ये महिलांचा उद्योगातील सहभाग वाढत आहे. परंतु, ज्या उद्योगातील कामांची रचना पुरुष कामगारांना लक्षात ठेवून झालेली आहे, त्यांना महिला कारखान्यात कामाला आल्यानंतर त्यांच्यासाठी आवश्यक त्या सोयी सुद्धा निर्माण करणे आवश्यक आहे. जे काम महिला अतिशय चांगल्या पद्धतीने करू शकतात, त्या कामांमध्ये त्यांना प्राधान्य देणे हे सुद्धा आवश्यक आहे. जुन्या कामगारांचा अनुभव, नवीन कामगारांची ताकद, महिलांमधील कल्पनाशक्ती यांचा उपयोग करीत उद्योग जागतिक स्पर्धेच्या दृष्टिकोनातून स्वतःला तयार करू शकतो. आम्ही सगळे मिळून आमचे ध्येय शिखर गाठू शकतो, अशा पद्धतीची समन्वयाची आणि परस्पर संवेदना असलेली जाणीव विकसित करण्याची आवश्यकता आहे. एखादी इमारत निर्माण करणारा कदाचित मजूर असू शकतो, परंतु विकसित भारत निर्माण करणारे सगळेच शिल्पकार आहेत. या विकसित भारतासाठी आतापासून सगळ्यांनी कार्यप्रवृत्त होणे आवश्यक आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### सरकारी शाळांमध्ये डिजिटल शिक्षणाची कमतरता?



अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतातील शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याचे धोरण शासनाकडून काही वर्षांपासून अवलंबले जात आहे. विशेषतः कोरोना काळापासून शालेय विद्यार्थ्यांच्या हातामध्ये मोबाईल सोपवून अशा दूरस्थ वर्गाची सुरुवात झाली होती. मात्र, या डिजिटल शिक्षण मोहिमेत अनंत अडचणी येत आहेत. सरकारच्या धोरणानुसार शिक्षण क्षेत्राचे डिजिटलीकरण घडवले जात असले तरी अद्याप खेड्यापाड्यांमधील शिक्षण यंत्रणा त्यासाठी सुसज्ज असल्याचे जाणवत नाही.

मुळातच खेड्यापाड्यातील सरकारी शाळांच्या इमारती अतिशय जीर्ण झाल्याचे चित्र पाहायला मिळते. शाळेत येण्यासाठी गरीब कुटुंबातील मुले प्रचंड संघर्ष करत असतात. त्याचबरोबर त्यांना शालेय सुविधांसाठीदेखील झगडावे लागत आहे. इतकेच नव्हे तर पुरेसा शिक्षकवर्गसुद्धा वर्गात नियुक्त नसल्यामुळे मुलांच्या शिक्षणाची मोठी आबाळ दिसून येते. अब्जावधी रुपये मोठमोठ्या विकास प्रकल्पांसाठी खर्च करणाऱ्या सरकारकडे शाळांच्या डागडुगीसाठीदेखील निधी उपलब्ध नसल्याचे जाणवते. खरे तर पिढ्यानपिढ्या शिक्षण न घेतलेल्या कुटुंबातील मुलांसाठी शिक्षण हे आनंददायी असणे गरजेचे आहे. त्याकरिता त्यांना शाळेकडे कसे आकर्षित करता येईल यावर जास्तीत जास्त भर दिला गेला पाहिजे. परंतु, त्याऐवजी शाळा, वर्ग आणि सामूहिक शिक्षणाच्या आनंदापासून देशातील कोट्यवधी मुलांना पारखे केले जात आहे. डिजिटल शिक्षण देण्याच्या अट्टहासापायी देशातील बहुसंख्य मुले शिक्षणापासून वंचित राहात आहेत. याचाही शासनाकडून गंभीरपणे विचार होण्याची आवश्यकता आहे. शाळेमध्ये समाजाच्या सर्वच स्तरावरील मुलांनी एकत्र येऊन ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया सुलभ कशी होईल, याची देशातील शिक्षण व्यवस्थेने अधिक लक्ष आणि काळजी घेणे आवश्यक आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## वाचक पत्रे

### उत्सवाचे पावित्र्य आणि मांगल्य टिकवा

लोकमान्य टिळकांनी समाजप्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकजागृतीसाठी सार्वजनिक गणेशोत्सवाची पायाभरणी केली होती. जातिभेद विसरून सर्वांनी एकत्र यावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी आणि आनंदाने हा सण साजरा करावा, हा त्यामागील मूळ उद्देश होता. मात्र, काळाच्या ओघात या उत्सवाचे स्वरूप पूर्णपणे बदलल्याचे दिसते.

सध्याच्या परिस्थितीकडे पाहिल्यास अनेक चिंताजनक बाबी समोर येतात. उत्सवात वर्गणीसाठी होणारी जबरदस्ती आणि प्रचंड खर्च करून उभारले जाणारे भव्य मंडप सामान्य नागरिकांना नकोसे वाटतात. त्याहूनही दुर्दैवी म्हणजे, ज्या सात्त्विक आणि मंगलमूर्तीची आपण मनोभावे पूजा करतो, त्या आराध्य देवतेची प्रतिष्ठा राखून तिची स्थापना करण्याऐवजी काही ठिकाणी अतिशय विद्रूप किंवा अयोग्य पद्धतीने मूर्ती बसवल्या जातात. डीजेमुळे होणारे ध्वनिप्रदूषण, काही मंडळांमधील अनुचित प्रकार आणि उत्सवाचे झालेले बेसुमार व्यापारीकरण हे नकोसे वाटते. वर्गणीची सक्ती थांबवून, मूर्तीची प्रतिष्ठा राखून, पर्यावरणपूरक आणि साध्या पद्धतीने हा उत्सव साजरा केला पाहिजे; जेणेकरून बाप्पाचे पावित्र्य, संस्कृतीचा वारसा आणि सामाजिक सलोखा टिकून राहील.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

■■■

### आधुनिक जीवन : समस्या व योग

यक्ष प्रश्नांपैकी एक प्रश्न होता की सर्वांत मोठी धनसंपत्ती कोणती? या प्रश्नाला युधिष्ठिराने उत्तर दिले की शारीरिक आरोग्य हीच खरी सर्वांत मोठी धनसंपत्ती आहे. आज आपण धन, पैसा, जमीन हीच खरी संपत्ती समजतो. तुमच्याजवळ खूप पैसा आहे, पण त्याचा आनंद घेण्यासाठी आवश्यक शारीरिक संपदा नसेल तर या पैशाचा काहीही उपयोग नसतो,. म्हणून शारीरिक आरोग्य महत्त्वाचे आहे. आयुष्यभर निरोगी राहायचे असेल तर योगासनासारखा दुसरा पर्याय नाही.

आधुनिक जीवन अतिशय गतिमान झालेले आहे. पूर्वी नोकरीची वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ६ पर्यंत वेळ होती. ती आता इतकी बदलली आहे की त्याला आता वेळेचे बंधनच राहिलेले नाही. त्यामुळे अनारोग्य वाढले आहे. कामामुळे धनसंपदा वाढली, पण खरी संपत्ती शरीराचे आरोग्य आहे, हे आपण विसरत चाललो आहोत. शरीर प्रकृती नीट ठेवायची असेल तर दिवसाच्या २४ तासांपैकी किमान १ तास तरी शारीरिक श्रम करणे आवश्यक आहे. या एका तासामध्ये तुम्ही कुठलाही व्यायाम करू शकता, जसे की फिरायला जाणे, कोणता तरी खेळ खेळणे अथवा स्विमिंग करणे. हा व्यायाम तुमच्या वयाप्रमाणे व शारीरिक क्षमतेप्रमाणे करायचा आहे. यासाठी योगासारखा दुसरा पर्याय नाही.

नागपूर येथील रामनगर येथे योगाभ्यासी मंडळ आहे. शारीरिक आरोग्य उत्तम ठेवावयाचे असेल तर प्रत्येक व्यक्ती याचा लाभ घेऊ शकते. येथे योगासन वर्ग निःशुल्क आहेत हे विशेष. ■

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'महाविस्तार एआय' ॲपमुळे कृषी विषयक माहिती आता एका क्लिकवर : लोखंडे

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २१ सप्टेंबर : राज्याच्या कृषि विभागाने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'महाविस्तार एआय' प विकसित केले आहे. या ॲपमुळे शेतकर्यांना शेती विषयी अचूक माहिती आणि मदत एकाच क्लिकवर मिळणार असल्याचे कृषि विभागाचे सूर्यकांत लोखंडे यांनी सांगितले.

गणेशोत्सवानिमित्त माहिती व जनसंपर्क विभागाच्या जिल्हा माहिती कार्यालयामार्फत औसा तालुक्यातील बोरफळ येथील चौकातला राजा गणेश मंडळाच्या सहकार्याने लोकसंवाद २०२६ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे डॉ. ऋषिकेश खारोळकर, कौशल्य विकास अधिकारी गिरीश महामुनी, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, विभागीय माहिती कार्यालयातील सहायक अधीक्षक अशोक माळगे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

पीक वाढीच्या टप्प्यानुसार पीक सल्ला, पीक प्रमाणित कार्यपद्धती, हवामानाचा अचूक अंदाज, खत मात्रा गणक, कीड - रोग ओळख व यावर उपाय, पिकांचे बाजारभाव, यशस्वी शेतकऱ्यांच्या यशोगाथा, गोदाम उपलब्धता याविषयीची माहिती 'महाविस्तार एआय' पवर एकाच ठिकाणी शेतकऱ्यांना उपलब्ध होते. यातील चॅटबॉटद्वारे शेतकऱ्यांनी तोंडी विचारलेल्या प्रश्नांना अचूक व अधिकृत उत्तरे मिळतील, असे लोखंडे यांनी सांगितले.



# विविध वृत्त.....

## झेडपी अध्यक्षांच्याच बंगल्यात चोरी सोन्यासह १६ लाखांचा ऐवज लंपास



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ सप्टेंबर : ज्यांच्या खांद्यावर जिल्ह्याच्या विकासाची धुरा, त्यांचाच बंगला असुरक्षित निघाला आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष उषा संभाजी पाटील तळेगावकर यांच्या शासकीय बंगल्याचे कुलूप तोडून चोरट्यांनी १२ लाखांची रोकड आणि चार तोळे सोन्याचे दागिने, असा एकूण १६ लाखांचा ऐवज लंपास केला. एमआयडीसी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल - झाला आहे.

१८ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० ते - २० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेदरम्यान ही चोरी झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.. अध्यक्षांचे कुटुंबीय बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी शासकीय वसाहतीतील बंगल्याच्या मुख्य दरवाजाचे कुलूप उचकटले. आत शिरून बेडरूमचा दरवाजा तोडला आणि लोखंडी कपाटातील लॉकर फोडून रोकड व दागिने लंपास केले. चोरीला गेलेल्या दागिन्यांत झुमके, सरपाळे आणि चार अंगठ्यांचा समावेश आहे. सकाळी सुमारे ११.१० वाजता वाहनचालक लक्ष्मण राठोड यांनी स्वीय सहायक प्रमोद ज्ञानेश्र्वर साबणे यांना फोनवरून बंगला फोडल्याचे कळवले.

# प्रवाशांच्या सोई - सुविधेकडे बघितले तरच महामंडळ फायद्यात ...





तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे

लातूर दि. २१ सप्टेंबर : महाराष्ट्रात आता एस टी महामंडळात नवीन अत्याधुनिक२०० व्होल्वो बस सामील होणार असल्याच्या बातम्या वाचल्या . या बसमध्ये१७० आसनी आणि३० शयनयान बस असणार आहेत . दर्जेदार सुविधा आणि एसटी वरील विश्र्वास यांच्या बळावर लांब पल्ल्याच्या प्रवासी सेवेत लालपरी आता दमाने, नव्या रूपात पाहायला मिळेल , अशी माहिती परिवहन मंत्र्यांनी दिली तसेच ते म्हणाले की, विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदा एसटी महामंडळाच्या टप्प्यामध्ये व्हाल्वो बसेस समाविष्य होत असून लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सध्या अनेक प्रवासी अधिक भाडे देऊन खाजगी आराम बससेवे ला पसंती देतात . वातानुकूलीत आरामदायी आसन व्यवस्था, कमी प्रवास वेळ यामुळे खाजगी बससेवेचा स्वतंत्र प्रवासी वर्ग निर्माण झाला असून या प्रवाशांना एसटी कडे आकर्षित करण्यासाठी केवळ पर्याय उपलब्ध करून प्रवाशांच्या अपेक्षा पूर्ण करणारी सेवा देण्याचे उद्दिष्ट एसटी ने ठेवले आहे

या बसमध्ये दिवसा आरामदायी तर रात्री शयनयानाची सुविधा असून २५० किलोमीटर पेक्षा अधिक अंतराच्या किमान पाच ते सहा तासांच्या प्रवासासाठी आरामदायी४५ आसनी बस तर रात्रीच्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी३० किंवा४५ शयनयान क्षमतेच्या बसेस उपलब्य करून देण्यात येणार आहेत . या बसचे डिजीटल पद्धतीने सहज आरक्षण करता येणार आहे

प्रवाशांना केवळ आरामदायी बसच नव्हे तर हाय एंड प्रवासी सेवांचा अनुभव मिळावा यासाठी नव्या व्होल्वो बसमधील आतिथ्य व्यवस्थापनासाठी खाजगी संस्थेची मदत घेण्यात येणार आहे .

वरील गोष्टींचे स्वागत केले पाहिजे कारण एसटी महामंडळाच्या ताफ्यात नवीन अत्याधुनिक२०० बस येणार आहेत पण एक बाब परिवहन मंत्र्याच्या लक्षात आणून द्यावी वाटते . ती अशी की, सर्वसामान्य प्रवाशांना या बस चे भाडे परवडणारे असणार का ? आणि या बससाठी खाजगी एजन्सी कशासाठी ? मंडळातील काही निवडक लोकांची एक टिम तयार करून त्यांच्या कडून हे काम करून घेता येणार नाही का?

आजकाल मंडळाच्या कोणत्याही बसमधील कंडक्टर च्या कामावर लक्ष देण्याची गरज आहे असे आमचे म्हणणे आहे कारण हे कंडक्टर प्रवाशांची अरेरावीची भाषा वापरतात, त्यांच्या शी असभ्य वर्तन केल्याच्या घटना नवीन नाहीत .

साधे लातूर - औसा या मार्गाचा विचार केला तर बरेच लक्षात येईल . या मार्गावर शिवाई आणि सोलापूर कडे जाणाऱ्या बसेच बऱ्याच असल्यातरी औशाच्या प्रवाशांना बसमध्ये चढू दिले जात नाही कारण सांगितले जाते की, ही बस जादा आहे . जादा बसमध्ये प्रवाशांनी चढायचे नाही का ? ज्या मार्गाने बसेस जाणार आहेत त्या मार्गातील थांब्यावर बस थांबणार नसल्यामुळे प्रवासी मिळणार नसल्याने महामंडळाचेच नुकसान होत असते हे कर्मचाऱ्यांच्या लक्षात कसे येत नाही . याचा विचार होणे आवश्यक असून केवळ अत्याधुनिक बस ताफ्यात आल्याने मंडळ फायद्यात थोडेच येणार आहे .

## राजर्षी शाहू महाविद्यालयात जनजागृतीचा अनोखा उपक्रम




तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ सप्टेंबर : राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी सायबर पोवाड्याचे अनोखे सादरीकरण करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात गड-किल्ल्यांची राखण करण्यासाठी मावळे सज्ज असायचे, तर आजच्या डिजिटल युगात आपल्या डिजिटल जगाची राखण करण्यासाठी सायबर योद्धे सज्ज आहेत, ही संकल्पना पोवाड्यातून मांडण्यात आली. पूर्वी शत्रूंकडून गड-किल्ल्यांना धोका निर्माण होत असे, तर आज सायबर गुन्हेगारांकडून मोबाईल, सोशल मीडिया खाती, वैयक्तिक माहिती आणि डिजिटल व्यवहारांना धोका निर्माण होऊ शकतो, हा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

हा सायबर पोवाडा सायबर वॉरिअर अविष्कार कांबळे, नरेश पंडित, आयुष जोशी, प्राची भोसले व गायत्री मायकर यांनी सादर केला. पारंपरिक पोवाड्याच्या माध्यमातून आधुनिक सायबर सुरक्षेचा विषय विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावी आणि मनोरंजक पद्धतीने पोहोचविण्यात आला.

पोवाड्यातून ऑनलाइन फसवणूक, संशयास्पद लिंक, ओटीपीची सुरक्षितता, मजबूत पासवर्ड, वैयक्तिक माहितीचे संरक्षण, सोशल मीडिया सुरक्षा तसेच डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी याबाबत जनजागृती करण्यात आली.

आजचे सायबर वॉरियर्स ही संकल्पना विद्यार्थ्यांसमोर मांडत डिजिटल जग सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येकाने जागरूक व जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचे आवाहन करण्यात आले. या अनोख्या सादरीकरणाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## मुरुड येथे 'लोकसंवाद २०२६' कार्यक्रमात आरोग्य विभागाच्या योजनांविषयी मार्गदर्शन



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २१ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'लोकसंवाद २०२६' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत मुरुड येथे महाराज गणेश मंडळाच्या कार्यक्रमात आरोग्य विभाग, खादी ग्रामोद्योग महामंडळाच्या योजनांची माहिती देण्यात आली.

एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व नागरिकांना युनिव्हर्सल हेल्थ कव्हर पुरवले जात आहे. या योजनेअंतर्गत कुटुंबातील एक किंवा सर्व सदस्यांना प्रतिवर्ष ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत आरोग्य कव्हरेज दिले जात असून, मूत्राशय किंवा मूत्रपिंड (किडनी) प्रत्यारोपणासाठी ४.५ लाख रुपयांपर्यंतचे आर्थिक सहाय्य दिले जाते. याशिवाय, ज्येष्ठ नागरिकांना वैयक्तिकरित्या ५ लाख रुपयांपर्यंतचा अतिरिक्त लाभ दिला जातो, तसेच रस्ते अपघातात गंभीर जखमी झालेल्या रुग्णांना पी. एम. राहत निधीतून १.५० लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंत तातडीने वैद्यकीय उपचार पुरवले जातात, अशी माहिती आरोग्य विभागाचे धनंजय नवगिरे आणि गोविंद सुरवसे यांनी दिली.

या योजनेमध्ये लाभार्थ्यांसाठी एकूण २,३९९ आजारांवर मोफत उपचार व शस्त्रक्रियांची सुविधा उपलब्ध असून, त्यात शासकीय रुग्णालयांसाठी २२३ वैद्यकीय प्रक्रिया राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच हृदय, फुफ्फुस आणि यकृत प्रत्यारोपणासारख्या अत्यंत गंभीर व दुर्धर आजारांच्या उपचारासाठी सहाय्य दिले जात आहे. रुग्णांना सुलभ मदत आणि मार्गदर्शन करण्यासाठी आरोग्यमित्र नियुक्त करण्यात आले आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लातूर जिल्ह्यात १६ शासकीय रुग्णालये, ५० प्राथमिक आरोग्य केंद्रे, ५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ४८ खाजगी रुग्णालये अशी एकूण ११९ रुग्णालये अंगीकृत करण्यात आली असल्याची माहिती आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मधाचे गाव आणि प्रधानमंत्री विश्र्वकर्मा योजनेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांनी लोकसंवाद उपक्रमाचा हेतू विशद केला.

यावेळी मुरुडचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश ठोंबरे यांच्यासह अभिषेक सहालुगडे, विकास सूर्यवंशी, शुभम जेलेवाड, विशाल कणसे, ओमकार करपे, अजिंक्य माळी, सौरभ सापसोड, रवी देशमुख, आकाश सुरवसे, गजानन वडगणे , सौरभ गायकवाड, गणेश वडगणे , ऋषभ हरंगुळकर, ऋषी राऊत, कदादा लांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी केली दुष्काळग्रस्त भागातील पिकांची पाहणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ सप्टेंबर : देवणी तालुक्यातील लासोना, वडमुरंबी, दवणहिप्परगा तसेच निलंगा तालुक्यातील झरी येथे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी आज पिक पाहणी दौरा करून दुष्काळामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी व नुकसानीची माहिती जाणून घेतली.

पावसाअभावी पिकांवर झालेला विपरीत परिणाम आणि शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकट लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या कृषी मंत्र्यांकडे पाठपुरावा करून शेतकऱ्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्र्वासन खा. डॉ. काळगे यांनी दिले. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, पंचायत समिती सदस्य सगर, जिल्हा परिषद सदस्य औदुंबर पांचाळ, अजित माने, प्रा. बंडगर, प्रा. चिद्रे यांच्यासह लासोना, देवणी परिसरातील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रिंगरोडवरील पथदिवे बंद; नागरिक त्रस्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ सप्टेंबर : शहरातील रिंगरोडवरील पथदिवे अनेक ठिकाणी बंद आहेत. त्यामुळे नागरिकांना रात्रीच्या वेळी अंधारातून प्रवास करावा लागत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी लाखो रुपये खर्चुन पथदिवे उभारले असतील तर ते सुर करण्याची आणि नियमित देखभाल करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल उपस्थित होत आहे. छत्रपती चौक ते खाडगाव, चौकमार्गे पीव्हीआर रेणापूर नाका या मार्गावर दिवसेंदिवस वाहतूक वाढत आहे. शहरातील अंतर्गत वाहतूक कमी करण्यासाठी बाह्यवळण मार्गाचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. मात्र, रात्रीच्या वेळी रस्त्यावरील पथदिवे बंद असल्याने वाहनधारकांसह पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## माऊली शैक्षणिक संकुलात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात संपन्न



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ सप्टेंबर : गुरुवारी रोजी येथील अंबेजोगाई रोडवरील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित माऊली बालक मंदिर, माऊली विद्यार्थी विकास केंद्र व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल ,लातूर येथे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अतिशय नाविन्यपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे संस्थेचे कोषाध्यक्ष मा. श्री तानाजी बेवनाळे पाटील सर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. याप्रसंगी संस्था सचिव श्री गंगाधर आरडले सर उपस्थित होते. यानंतर मान्यवरांच्या हस्ते श्री गणेशाची आरती संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री गाडेकर सर यांनी केले. विद्यालयातील बालवाडी ते दहावी सेमी व इंग्रजी माध्यमातील अनेक विद्यार्थ्यांनी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त उत्कृष्ट भाषणे सादर केली. तसेच इतिहास शिक्षक श्री पालकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल १०ींह क्लासच्या विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण ऐतिहासिक क्षेत्रभेट वळीश्रिरू लेरीव तयार केला व रझाकारास भारतीय सैन्याने रणगाड्याखाली चिरडण्याचे उत्कृष्ट वर्किंग मॉडेल द्वारे सादर करून सर्व उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी स्वतः इतिहास शिक्षकांसोबत लातूर येथील अनेक ऐतिहासिक स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील माहिती गोळा करून त्याविषयी थ्रीडी वॉल प्रोजेक्ट ही तयार केला .या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या प्राचार्या सौ.कविता आरडले मॅडम व उपप्राचार्या काळे मॅडम व प्रमुख पाहुण्यांनी भरभरून कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कला शिक्षिका भाग्यश्री उबाळे यांनी केले. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी शिक्षक वृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी व्यवस्थापक श्री गोपाळ करडिले व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

# जिंतूरमध्ये बंजारा आरक्षण आंदोलनाला हिंसक वळण

## आंदोलक आडे यांचा आत्मदहनाचा प्रयत्न; रास्ता रोको, वाहनांची तोडफोड; बाजारपेठेत काही काळ तणाव





**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी जिंतूर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला सोमवारी (दि. २१) अचानक हिंसक वळण लागले. गेल्या अनेक दिवसांपासून उपोषण करणारे आंदोलक विनोद आडे यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने आंदोलनस्थळी खळबळ उडाली. त्यानंतर संतप्त आंदोलकांनी रस्त्यावर उतरून रास्ता रोको केला. यावेळी आयशर ट्रक, ऑटो आणि स्कूल व्हॅनची तोडफोड करण्यात आल्याने शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

बंजारा समाजाला एसटी आरक्षणाचा लाभ मिळावा, या मागणीसाठी विनोद आडे हे गेल्या अनेक दिवसांपासून उपोषण करीत आहेत. शासनाने मागणीबाबत ठोस निर्णय घ्यावा, अशी आंदोलकांची भूमिका आहे. सोमवारी आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित असताना आडे यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याचे समोर आले. या घटनेनंतर आंदोलनस्थळी गोंधळ निर्माण झाला. त्यानंतर आंदोलकांनी अचानक रस्त्यावर उतरून रास्ता रोको सुरू केला.

पोलिसांचा बंदोबस्त तैनात असतानाही वाहतूक रोखण्यात आल्याने रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या. दरम्यान, संतप्त आंदोलकांनी रस्त्यावर असलेल्या आयशर ट्रक, ऑटो तसेच एका स्कूल व्हॅनची तोडफोड केली. या प्रकारामुळे वाहनचालक, नागरिक आणि परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

आंदोलनाला हिंसक वळण लागल्याची माहिती शहरात पसरल्यानंतर व्यापाऱ्यांमध्येही घबराट निर्माण झाली. संभाव्य अनुचित प्रकार टाळण्यासाठी काही व्यापाऱ्यांनी दुकाने बंद केली. त्यामुळे काही काळ बाजारपेठेत शुकशुकाट पसरला.

बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन तीव्र होत असतानाच सोमवारी घडलेल्या प्रकारामुळे प्रशासनासमोर कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. आंदोलकांच्या मागणीवर शासनाने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी होत असतानाच सार्वजनिक रस्ता अडविणे आणि वाहनांची तोडफोड केल्याच्या प्रकाराबाबत पोलिसांकडून पुढील काय कारवाई केली जाते, याकडे लक्ष लागले आहे. शहरातील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिस बंदोबस्त कायम ठेवण्यात आला आहे.

## 'शेतकरी मेळावा अपडेट

### मोबाईल हॅक करून ज्वेलर्सची ७ लाखांची फसवणूक

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी शहरातील जनता मार्केट मेन रोड परिसरातील ज्वेलर्सचे दुकान चालविणाऱ्या व्यावसायिकाचा मोबाईल हॅक करून अज्ञात व्यक्तीने ७ लाख ५ हजार ३०० रुपये काढून घेत आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी पाथरी पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अन्सारी अब्दुल मुत्तलीफ यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. त्यांचे जनता मार्केट परिसरात ज्वेलर्सचे दुकान आहे. अज्ञात व्यक्तीने त्यांचा मोबाईल हॅक करून 'इन्फीलॉक्स टीव्ही' या नावाचे ॲप डाउनलोड केले. त्यानंतर वेगवेगळ्या खात्यांतून एकूण ७ लाख ५ हजार ३०० रुपये काढून घेतले. हा प्रकार १६ सप्टेंबर रोजी दुपारी १ ते १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेच्या दरम्यान घडला. मोबाईलमधून रक्कम परस्पर काढण्यात आल्याचे लक्षात आल्यानंतर अन्सारी यांनी पाथरी पोलिसांत तक्रार दाखल केली. याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे तपास करीत आहेत.

### अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी आरोपीला २० वर्षे

कारावास : अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निकाल; ५८ हजारांचा दंड

**परभणी,/प्रतिनिधी :** दूध आणण्यासाठी गेलेल्या अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या प्रकरणात अवघ्या दहा महिन्यांत निकाल लागला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश-२ व्ही. एम. सुंदाळे यांनी आरोपी दीपक बाळू भोसले (वय २५) यास २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली असून ५८ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंडाच्या रकमेतून ५० हजार रुपये पीडितेला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, ११ सप्टेंबर २०२५ रोजी एका ६० वर्षीय फिर्यादीने सोनपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यांची नात दूध आणण्यासाठी गेली होती. ती घरी परत न आल्याने तिचा शोध घेतला असता आरोपीच्या घरात ती आढळून आली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने घटनास्थळाचा पंचनामा करून आवश्यक साहित्य जप्त केले. तत्कालीन पोलिस निरीक्षक अशोक गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक आशिष कांबळे यांनी पंचनामा केला. पोलिस उपनिरीक्षक अजय किरकन यांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकार पक्षातर्फे आठ साक्षीदार तपासण्यात आले. सुनावणीअंती २१ सप्टेंबर २०२६ रोजी न्यायालयाने आरोपी दीपक बाळू भोसले यास दोषी ठरवत २० वर्षे सश्रम कारावास व ५८ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंडाच्या रकमेतून ५० हजार रुपये पीडितेला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले. सरकार पक्षाच्या वतीने मुख्य जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. ज्ञानोबा दराडे यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. सचिन पौळ यांनी सहकार्य केले. कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोलिस उपनिरीक्षक सुरेश चव्हाण, पोलिस अंमलदार वंदना आदोडे व मारोती कुंडगीर यांनी काम पाहिले.

### चारचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू; सिंगणापूर फाट्याजवळ अपघात

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी-गंगाखेड मार्गावर सिंगणापूर फाट्याजवळ सोमवारी (दि. २१) दुपारी दोनच्या सुमारास चारचाकी वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात कौळासवाडी येथील ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. माधव सोनेवाड असे मयत तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, माधव सोनेवाड हे मिस्त्री काम करत होते. सिंगणापूर येथील पेट्रोलपंपाजवळ त्यांच्या दुचाकीला चारचाकी वाहनाने धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यांना सहारा रुग्णवाहिकेच्या सहाय्याने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच दैठणा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

### ज्ञानोपासक महाविद्यालयात मत्स्यखाद्य महोत्सव व ओळख तंत्रज्ञान कार्यशाळा : विद्यार्थी-प्राध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग; विविध मत्स्य प्रजातींचे प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन




**जिंतूर,/प्रतिनिधी :** येथील ज्ञानोपासक महाविद्यालयातील मत्स्यशास्त्र विभागाच्या वतीने 'भारतीय मत्स्यखाद्य महोत्सव' आणि 'मत्स्य ओळख तंत्रज्ञान कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले. या दोन्ही उपक्रमांना विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. धनाजी पाटील व सेनगाव येथील डॉ. संदीप मरकड उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. शाम गोरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. संतोष जाधव, तसेच नॅकचे समन्वयक प्रा. डॉ. दिनकर कोतवाल यांची विशेष उपस्थिती होती. मत्स्य ओळख तंत्रज्ञान कार्यशाळेत विविध जिवंत मत्स्य प्रजातींचे प्रदर्शन भरविण्यात आले. प्रा. डॉ. धनाजी पाटील व डॉ. संदीप मरकड यांनी कटला, रोहू, मिरगल, झिंगा, खेकडा आदी मत्स्य प्रजातींची ओळख करून देत त्यांचे वैशिष्ट्य, वेगळेपण व वर्गीकरण याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. 'भारतीय मत्स्यखाद्य महोत्सवा'त विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या मत्स्य पाककृती तयार करून त्यांचे प्रदर्शन भरविले. विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच प्राध्यापकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध मत्स्य पदार्थांचा उपस्थितांनी आस्वाद घेतला. या उपक्रमातून भारतीय खाद्यसंस्कृतीतील मत्स्य पदार्थांचे महत्त्व तसेच मत्स्य उत्पादनाला मूल्यवर्धनाची जोड देण्याची गरज अधोरेखित झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मत्स्यगंधा मंडळाचे अध्यक्ष आकाश देवकते यांनी केले, तर मत्स्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. निवृत्ती पोपतवार यांनी आभार मानले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. रवी कावळे, प्रा. डॉ. भागवत ठाकरे, प्रा. शिरीषकुमार रुद्रवार, प्रा. डॉ. नयना रत्नपारखी व संशोधक विद्यार्थिनी पूजा तरटे यांनी परिश्रम घेतले.

## व्हिजन पब्लिक स्कूलमध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा




**सोनपेठ,/प्रतिनिधी:** शहरातील व्हिजन पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे दिनांक १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या सचिव सौ. सारिका पवार उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विजयकुमार परभणीकर (गृहपाल, भगवान बाबा ऊसतोड कामगार वसतिगृह) तसेच प्राचार्य आत्माराम गंगणे, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या सचिव सौ. सारिका पवार यांच्या हस्ते ध्वजारोहणाने करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली व प्रमुख पाहुणे आत्माराम गंगणे सरांनी व प्राचार्य राजेंद्र प्रसाद यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्मे व स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण केले.मराठवाड्याला निजामाच्या राजवटीतून मुक्त करण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेला लढा, त्यांचे बलिदान आणि मराठवाडा मुक्ती संग्रामाचे ऐतिहासिक महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यसैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना निर्माण व्हावी, हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.या प्रसंगी शाळेचे प्राचार्य, उपप्राचार्य, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम देशभक्तीमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला.

## शाळकरी मुलांना घेऊन जाणारा ॲटो उलटला; १६ मुले-मुली जखमी!




**पूर्णा,/प्रतिनिधी-** शाळकरी मुलांना घेऊन जाणारा ॲटो उलटून झालेल्या अपघातात तब्बल १६ते१८ मुले-मुली जखमी झाल्याची घटना सोमवारी (ता. २१) दुपारी शहरापासून जवळच असलेल्या झिरोफाटा रोडवर घडली. जखमी विद्यार्थ्यांवर पूर्णा येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ॲटोमध्ये सुमारे २० विद्यार्थी असल्याची प्राथमिक माहिती असून, सुदैवाने या अपघातात मोठा अनर्थ टळला. याबाबत मिळालेली माहिती अशी की पूर्णा तालुक्यातील माटेगाव येथील विद्यार्थी विद्यार्थिनी पूर्णा येथून शाळा सुटल्यानंतर ॲटो क्र. एम.एच. २२टीयू ४२६५ मधून नेहमीप्रमाणे सोमवारी सकाळी शाळेत आले होते. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास शाळा सुटल्यानंतर हे विद्यार्थी त्याच ॲटोने गावाकडे जाण्यासाठी निघाले होते. दरम्यान, झिरोफाटा रोडवरील गॅस एजन्सीजवळ ॲटो आला असता चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने ॲटो रस्त्याच्या कडेला जाऊन धडकला सुदैवाने रस्त्याच्या कडेला मुरमाचा ढीग असल्यामुळे ऑटो रस्त्याच्या अडकला त्यामुळे मोठा अनर्थ टळला असे उपस्थित नागरिकांनी सांगितले. अपघातामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकच गोंधळ उडाला.

घटनेची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख विशाल कदम, यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. राम भालेराव, बालाजी कदम, विष्णू कदम, गोविंद तेजबंद, आकाश बोबडे यांनी मदतकार्य सुरू केले. जखमी विद्यार्थ्यांना अन्य वाहनातून शहरातील खाजगी हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती शहर व परिसरात वाऱ्यासारखी पसरताच जखमी विद्यार्थ्यांच्या नातेवाईकांनी रुग्णालयाकडे धाव घेतली. त्यामुळे रुग्णालय परिसरात पालक, नातेवाईक आणि नागरिकांची मोठी गर्दी झाली होती

# परभणी-हिंगोलीच्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी आ.सईद खान यांची आक्रमक भूमिका- विशेष कृषी पुनर्वसन आराखडा मंजूर करण्याची कृषिमंत्र्यांकडे मागणी



**सोनपेठ,/प्रतिनिधी-** परभणी-हिंगोली जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात अत्यल्प पाऊस व पावसातील दीर्घ खंडामुळे निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळसदृश परिस्थितीची दखल घेत परभणी-हिंगोली विधान परिषद सदस्य आमदार सईद खान यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना सविस्तर निवेदन सादर करून शेतकऱ्यांच्या प्रति संवेदना ठेवून निवेदन सादर करून वेदना मांडल्या आहेत.जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर व त्यांच्या कुटुंबांना तातडीचा दिलासा मिळावा यासाठी परभणी-हिंगोली जिल्ह्यासाठी स्वतंत्र 'विशेष कृषी पुनर्वसन आराखडा' मंजूर करण्याची जोरदार मागणी त्यांनी केली आहे. आमदार सईद खान यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले

परभणी-हिंगोली जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाचे अत्यल्प प्रमाण आणि पावसातील दीर्घ खंडामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मूग यांसह भाजीपाला व फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अनेक भागांमध्ये पिके सुकून गेली आहेत. या परिस्थितीचा परिणाम केवळ चालू खरीप हंगामापुरता मर्यादित नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर, आगामी रब्बी हंगामावर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे. दुष्काळामुळे अनेक शेतकरी कुटुंबांची आर्थिक परिस्थिती गंभीर बनली असून मुलांच्या शिक्षणावरही त्याचा परिणाम होत असल्याचे नमूद करत आमदार खान यांनी शासनाने तातडीने व्यापक उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. निवेदनामध्ये परभणी-हिंगोली जिल्ह्यासाठी स्वतंत्र विशेष कृषी पुनर्वसन आराखडा मंजूर करून त्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच दुष्काळामुळे बाधित शेतकऱ्यांना पुढील दोन हंगामांत सावरण्यासाठी कालबद्ध कृती आराखडा राबविण्याची मागणीही करण्यात आली आहे. यासोबतच प्रत्येक गावात प्रत्यक्ष पाहणी करून सोयाबीन, कापूस, तूर, मूग, भाजीपाला आणि फळबागांच्या नुकसानीचे सर्वसमावेशक पंचनामे करण्यात यावेत, एकही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. आमदार सईद खान यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट मदत जमा करण्याची मागणी केली आहे. तसेच पावसातील मोठा खंड आणि प्रत्यक्ष पीक नुकसानीचा विचार करून पीक विमा नुकसानभरपाई मिळण्यासाठी विमा कंपन्यांना योग्य निर्देश देण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आहे. आगामी रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रमाणित बियाणे, खते व आवश्यक कृषी निविष्ठा मोफत अथवा विशेष अनुदानावर उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली आहे. उपलब्ध पाण्याचे नियोजन करून धरणे, प्रकल्प, तलाव व कालव्यांतील पाण्याचा शाश्वत वापर करत उभ्या पिकांसाठी संरक्षित पाणी देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. दुष्काळग्रस्त गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची व सिंचनाची विशेष व्यवस्था, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा तसेच ठिबक व तुषार सिंचनासाठी विशेष अनुदान देण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे पीक कर्ज पुनर्गठित करून आगामी रब्बी हंगामासाठी नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचाही मुद्दा त्यांनी मांडला आहे. दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होऊ नये यासाठी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, महाविद्यालय तसेच व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची चालू शैक्षणिक वर्षाची फी माफ करावी, तसेच शिष्यवृत्ती, वसतिगृह शुल्क आणि इतर शैक्षणिक खर्चासाठी विशेष मदत द्यावी, अशी मागणीही आमदार खान यांनी केली आहे. याशिवाय पशुधनासाठी चारा व पाण्याची स्वतंत्र व्यवस्था, चारा छावण्या सुरू करणे, जलसंधारणाच्या कामांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देणे, शेततळी, नाला खोलीकरण, बंधारे, गाळ काढणे, जलपुनर्भरण आणि सूक्ष्म सिंचनाच्या कामांना गती देणे याबाबतही त्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे. ग्रामीण भागातील शेतमजुरांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी जलसंधारण आणि मृदसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू करून विविध योजनांमधून रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे. परभणी-हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सध्या केवळ नुकसानभरपाई नव्हे तर आर्थिकदृष्ट्या पुन्हा सक्षम करणाऱ्या सर्वसमावेशक पुनर्वसनाची गरज असल्याचे सांगत आमदार सईद खान यांनी दुष्काळाचा फटका शेतकरी कुटुंबांच्या शिक्षण, पशुधन, पाणी, रब्बी हंगाम आणि शेतीपूरक व्यवसायांवर होऊ नये यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे. दुष्काळ आढावा बैठकीत परभणी-हिंगोली जिल्ह्यासाठी स्वतंत्र विशेष कृषी पुनर्वसन आराखडा मंजूर करून त्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करावा व त्याची कालबद्ध अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित विभागांना द्यावेत, अशी आग्रही मागणी आमदार सईद खान यांनी कृषिमंत्र्यांकडे केली आहे.

# खा. रामराव वडकुते यांच्या प्रमुख उपस्थितीत सेवा संकल्प आढावा बैठक

## शेवटच्या घटकांपर्यंत कल्याणकारी योजना पोहोचवा-खा. वडकुते



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ सप्टेंबर**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात राबविल्या जाणाऱ्या 'सेवा संकल्प अभियाना'चा भाग म्हणून हिंगोली येथील भाजपा जनसंपर्क कार्यालयात जिल्हा आढावा बैठक सोमवारी संपन्न झाली. या बैठकीला मुख्य मार्गदर्शक म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते आणि खासदार रामराव वडकुते उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी अभियानाच्या आतापर्यंतच्या कामाचा आढावा घेतला आणि पुढील नियोजनाबाबत कार्यकर्त्यांना महत्त्वपूर्ण सूचना व मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना खासदार रामराव वडकुते म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सुरु झालेले 'सेवा संकल्प अभियान' हा समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत सरकारच्या कल्याणकारी योजना पोहोचवण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने थेट जनतेमध्ये जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत आणि त्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहिले पाहिजे. केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील जनतेला मिळवून देणे हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या आढावा बैठकीत अभियानांतर्गत आगामी काळात आयोजित करण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम, मोफत आरोग्य शिबिरे आणि स्वच्छता मोहिमांच्या पूर्वतयारीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच आगामी काळात प्रत्येक कार्यकर्त्याने गावोगावी जाऊन जनसंपर्क वाढवण्यावर अधिक भर द्यावा, असे आवाहन खासदार वडकुते यांनी केले.

या बैठकीला भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, अतिश दांडेगावकर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, शिवाजी पवार,जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, उमेश सोमाणी, संजय कावडे, राहुल मेने, मंडळ अध्यक्ष कांतराव कोटकर, रजनीश पुरोहित, ओमकार नावडे, विठ्ठल भोयर, दिनकर कोकरे, अदित्य देशपांडे, विजय कडतन, वर्षाताई खंदारे, गणेश पाटील, गुलाब भोयर सदाशिव सुर्यतळ उपस्थित होते.

# लोकसंवाद कार्यक्रमात नगर पालिकेच्या योजनांची माहिती

## जिल्हा माहिती कार्यालयाचा पुढाकार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ सप्टेंबर**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लोकसंवाद उपक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसरातील श्री सिद्धिविनायक बाल गणेश मंडळ येथे लोकसंवाद व सेवा संकल्प अधियानाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात हिंगोली नगरपरिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती उपस्थित नागरिकांना देण्यात आली. नागरिकांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी नगरपरिषदेचे अधिकारी पंडीत मस्के यांनी गणेशोत्सवानिमित्त राबविण्यात येत असलेल्या लोकसंवाद व 'सेवा संकल्प' अभियान कार्यक्रमांतर्गत नागरिकांना विविध योजनांची माहिती दिली. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), स्वनिधी ते समृद्धी, दिव्यांग कल्याणकारी योजना, एकल महिला सर्वेक्षण-२०२६, रमाई आवास योजना, बचतगट स्थापना व त्यांचे संवर्धन यासह विविध महिलांना देण्यात येणाऱ्या योजनांचा समावेश आहे.

शासकीय योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी नागरिकांनी संबंधित योजनांची माहिती घेऊन आवश्यक कागदपत्रांसह हिंगोली नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमास गणेश मंडळाचे अध्यक्ष तथा पत्रकार कल्याण देशमुख, नगरपरिषदेचे अधिकारी, विजय रामेश्वर,नरवाडे, चव्हाण, स्वच्छता महिला कर्मचारी विविध मान्यवर, महिला, बालके तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकसंवादाच्या माध्यमातून शासकीय योजना व उपक्रमांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# पोलिस उपमहानिरीक्षकांच्या पथकाच्या जुगार अड्ड्यावर धाडी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ सप्टेंबर**

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्याकडील पोलीस अधिकारी व अंमलदारांचे एक पथक परभणी व हिंगोली जिल्ह्यात रवाना केले होते. सदर पथकाने जिंतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, मौजे भिलज येथील गजानन ज्ञानदेव गित्ते यांच्या मालकीच्या पत्र्याचे शेडमध्ये छापा टाकला असता, सदर ठिकाणी उपस्थित असणारे लोक, पैसे लावून पपलू नावाचा जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले. सदर ठिकाणावरील उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी केली असता, सदर ठिकाणी दोस्ती मित्र मंडळ चॅरिटेबल ट्रस्ट, जिल्हा ठाणे यांचे लायसेन्सचे नावाखाली पपलू नावाचा जुगार खेळला जात असल्याचे व तो गजानन ज्ञानदेव गित्ते यांचे मार्फत बेकायदेशीर रित्या खेळविला जात असल्याचे पथकास आढळून आले. सदर कारवाईत पोलीसांनी, (३८) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांच्याकडून १,०२,४१० रुपयांची रोकड, (३३) मोबाईल, (१) चारचाकी वाहन व (१०) मोटार सायकली असा एकुण १३,८७,८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत, जिंतूर पोलीस ठाणे येथे गु. र.न. ५५०/२०२६ कलम ४, ५, १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तद्नंतर, पथकाने वसमत शहर पोलीस ठाणे हद्दीत, भट्टी गल्लीतील जुगार खेळणाऱ्यांकडे आपला मोर्चा वळविला. सदर ठिकाणी संबंधितांविरुद्ध कारवाई करत, ७०,२६० रुपयांची रोकड, (११) मोबाईल व (११) मोटार सायकली असा एकूण ९,६४,२६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, नमूद प्रकरणात एकूण (७) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुध्द वसमत शहर पोलीस ठाणे येथे गुरनं ५८७/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदवला आहे.

उपरोक्त दोन्हीही कारवायांत, पथकाने एकूण (४५) इसमांकडून १,७२,६७०/- रुपयांची रोकड, (४४) मोबाईल, (१) चारचाकी वाहन व (२१) मोटार सायकली असा एकूण २३,५२,०७०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह प्रदिप खानसोळे, गणेश राठोड, प्रमोद जाधव, संदिप वाघाडे, गजानन डवरे यांनी सहभाग घेतला.



**हिंगोली- नवसाला पावणारा गणपती विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मोठ्या वहिणी ज्योतीताई फडणवीस यांनी रविवारी आल्या होत्या. यावेळी संस्थाचे संचालक दिलीप बांगर, भाजपचे शिवा घुगे, पवन उपाध्ये, उमेश नागरे आदी. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### माहेश्वरी महिलांतर्फे अथर्वशीर्ष पठण



हिंगोली- गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर 'माहेश्वरी महिला शक्ती, हिंगोली' यांच्या वतीने रविवारी (दि. २०) सकाळी ठीक ६:०० वाजता स्थानिक विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या पावन प्रांगणात सामूहिक श्री अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. या सोहळ्यासाठी उपस्थित सर्व माहेश्वरी महिला भगिनी 'राणी' (ठरपळ झळपज्ञ) रंगाची साडी परिधान करून वेळेवर उपस्थित झाल्या होत्या. गणेशोत्सवाच्या मंगलमयी वातावरणात संपन्न झालेल्या या पठणाने संपूर्ण प्रांगण भक्तिमय झाले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. ममता कपिल मुंदडा, सुषमा चितलांगे, जयश्री मालपानी, दीपा धूत, रूपाली काबरा, मंगल झंवर, तारा मुंदडा, कृष्णा मंत्री, रेखा लाठी आणि मानसी खटोड़ यांच्यासह माहेश्वरी महिला शक्तीच्या सदस्यांनी विशेष पुढाकार घेतला. याप्रसंगी माहेश्वरी समाजातील महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री गणेशाचे पूजन व अथर्वशीर्ष पठणाचा लाभ घेतला.

### जगदंब नवदुर्गा महोत्सव समितीतर्फे बासापूजन



हिंगोली-अंतुले नगर, शिवनेरी चौक हिंगोली येथे जगदंब नवदुर्गा महोत्सवाचे औचित्य साधून मंदिराचा बासापूजन सोहळा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. हा कार्यक्रम खासदार रामराव वडकुते आणि पप्पू चव्हाण यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी मंदिराचे बासापूजन शास्त्राक्त पद्धतीने आणि मंत्रोच्चारात करण्यात आले. बळसोंड परिसरातील नागरिक, महिला, युवक तसेच आयोजक मित्र मंडळाचे सर्व सहकारी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बासापूजनानंतर खासदार रामराव वडकुते यांनी उपस्थितांना अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांमुळे समाजात एकोपा आणि बंधुभाव वाढीस लागतो, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक मित्र मंडळाच्या सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी बळसोंड परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सार्वजनिक दसरा महोत्सव २०२६ साजरा करण्यास प्रशासन असमर्थ

## एसआयआर, प्रारूप मतदार याद्या तसेच कर आकारणीचे कारण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ सप्टेंबर**

भारत निवडणुक आयोगाच्या आदेशानुसार यावर्षी मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमामुळे महसुल प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी सार्वजनिक दसरा महोत्सव घेण्यास असमर्थ आहे. त्यामुळे नगर पालिकेने पुढाकार घ्यावा असे पत्र उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी मुख्याधिकारी यांना पाठविले परंतु मुख्याधिकाऱ्यांनीही मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण आणि कर आकारणीचे कारण पुढे करीत सार्वजनिक दसरा महोत्सव साजरा करण्यास असमर्थता दाखविल्यामुळे यावर्षी सार्वजनिक दसरा महोत्सवावर अद्याप तरी काही तोडगा निघाला नाही.

उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी मुख्याधिकारी प्रांजली मुंडे यांना दिलेल्या पत्रामध्ये भारत निवडणुक आयोग यांच्या निर्देशानुसार मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरू आहे. त्याअनुषंगाने महसुल यंत्रणेमार्फत सदरील कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करणे करिता दिवसरात्र राबविण्यात येत आहे. सदरील कार्यक्रमाच्या अंतर्गत हिंगोली विधानसभा अंतर्गत जवळपास २४ हजार ४५५ विसंगती व न प्राप्त होणारे १७००० एवढे प्रचंड अर्जावर सुनावण्या घेवून त्यावर अभिप्राय देऊन त्याचे निराकरण करण्याचे काम हे कालमर्यादीत आहे. तसेच प्रारूप मतदार यादीवर दावे हरकती घेवून अंतिम मतदार यांदी माहे १९ ऑक्टोबर रोजी प्रसिध्द करावयाची आहे. याशिवाय राज्य निवडणुक आयोगमार्फत तालुक्यातील आगामी सार्वत्रिक ९५ ग्रामपंचायत निवडणुकीचे काम सुध्दा प्रगतीपथावर आहे. सदरील कार्यक्रमांतर्गत प्रभाग रचना व प्रभाग आरक्षण कार्यक्रम पूर्ण होऊन मतदार यादीचा कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत ७७५ सदस्य व ९५ सरपंच निवडून द्यावयाच्या प्रक्रियेकरीता तसेच या निगडीत मतदार यादीवरील दावे हरकती व आगामी ग्रामपंचायत निवडणूक पाहता महसूल यंत्रणेवर कामाचा बोजा राहणार आहे. याशिवाय राज्य निवडणूक आयोगामार्फत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीकरीता माहीती मागविण्याचे काम सुरू असल्याने या काळात सदरील निवडणूका लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व बाबींचा विचार करता सार्वजनिक दसरा महोत्सव २०२६ साजरा करण्याचे कार्य हे उपविभागीय अधिकारी हिंगोली तथा अध्यक्ष सार्वजनिक दसरा महोत्सव समिती हिंगोली व तहसीलदार हिंगोली तथा सार्वजनिक दसरा महोत्सव समिती हिंगोली यांचे मार्फत राबविणे शक्य होणार नाही. त्यामुळे मुख्याधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी, कर्मचारी यांचे मार्फत सार्वजनिक दसरा महोत्सव २०२६ साजरा करण्याचे आयोजन करावे तसेच याबाबतची संपूर्ण कार्यवाही आपले स्तरावरून करावी असे पत्रात नमुद करण्यात आले आहे.

या पत्राला नगर पालिकेच्या मुख्याधिकारी प्रांजली मुंडे यांनी भारत निवडणुक आयोग यांचे निर्देशानुसार मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत हिंगोली विधानसभा मतदार संघांतर्गत यादी भाग क्रमांक ३०५ ते ३१९ करिता मुख्याधिकारी यांची अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून जवळपास विसंगती व न प्राप्त होणारे असे एकूण ८१८ एवढे अर्जावर सुनावणी घेण्याचे काम आहे. नगरपालिकेचे कर आकारणीचे मागणी बिल वाटप करणे व वसुली हे व्यापक स्वरूपाचे काम तसेच स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत व नगर पालिका सर्वसाधारण सभेतील ठरावांची विहित मुदतीत अंमलबजावणी करणे आणि नगर पालिकेतील मंजूर आकृतीबंधातील उपलब्ध मनुष्यबळ पाहता एसआयआरचे काम पाहता हिंगोली सार्वजनिक दसरा महोत्सव २०२६ साजरा करण्याचे आयोजन करणे शक्य होणार नाही. त्यामुळे आपल्या स्तरावरून उचित निर्णय घ्यावा असे मुख्याधिकारी मुंडे यांनी पाठविलेल्या पत्रात नमुद करण्यात आले आहे.

भारतात दुसऱ्या क्रमांकाचा असणारा आणि दीडशे वर्षापेक्षा जास्त कालावधीची परंपरा असणारा ऐतिहासिक सार्वजनिक दसरा महोत्सव यावर्षी प्रशासनातील ताणतणावामुळे साजरा होतो की नाही याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. परंतु आ. तान्हाजीराव मुटकुळे, खा रामराव वडकुते तसेच दसरा महोत्सव समितीतील पदाधिकाऱ्यांनी हिंगोलीतील सार्वजनिक दसरा महोत्सवाची परंपरा कायम राखावी अशी मागणी यापूर्वीच प्रशासनाकडे केली आहे. परंतु यावर्षी महसूल प्रशासनासह नगर पालिका प्रशासानानेही कामाचा व्याप पाहता तसेच मनुष्यबळ पाहता सार्वजनिक दसरा महोत्सव २०२६ साजरा करण्यास असमर्थता दर्शवली असल्याची चित्र दिसत आहे.

# श्रीराम बाल गणेश मंडळातर्फे रक्तदान शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ सप्टेंबर**



श्रीराम बाल गणेश मंडळ नवा मोंढा, हिंगोली आणि युवा फ्रेंड्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय स्नेहल दोडल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ १८ व्या रक्तदान शिबिराचे आयोजन नवा मोंढा येथे करण्यात आले. हिंगोली नगरपालिकेचे गट नेते श्रीराम बांगर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व फीत कापून या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

समाजात रक्ताची गरज भागवण्यासाठी आणि तरुणांमध्ये सामाजिक जाणिवा रुजाव्यात, या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यंदाही या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटनानंतर उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचा उत्साह वाढवला आणि या स्तुत्य उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. या शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने युवकांनी रक्तदान केले.

यावेळी मंडळाचे गोपाल दुबे, घनश्याम तापडिया, ओम सारडा, आनंद अग्रवाल, सागर तापडिया, शंकर अग्रवाल, अर्पित दुबे, अक्षय सारडा, गगन चौरसिया, केशव दुबे यांच्यासह श्रीराम बाल गणेश मंडळ व युवा फ्रेंड्स असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रेड रिबन क्लबच्या नोडल अधिकारी व पिअर एज्युकेटरचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ सप्टेंबर**



जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय, हिंगोली यांच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विविध सोळा महाविद्यालयातील रेड रिबन क्लबचे नोडल अधिकारी व पिअर एज्युकेटर यांचे प्रशिक्षण डापकू सभागृहात घेण्यात आले. जिल्हा कार्यक्रम अधिकारी ज्ञानेश्वर चौधरी यांनी महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या तरुणांना एचआयव्ही/एड्सची जाणीव जागृती होण्याकरिता व त्यांना संसर्गापासून सुरक्षित ठेवण्यासाठी रेड रिबन क्लबचा सहभाग कसा महत्वाचा आहे व त्यांचे कार्य कश्याप्रकारे करायचे आहे हे सांगितले. याशिवाय एचआयव्ही/एड्स कार्यक्रम कसा राबवला जातो, एचआयव्हीला हद्दपार करण्यासाठी सर्वांचा सहभाग किती महत्त्वाचा आहे हे विषद केले. यावेळी डॉ अरुण दमकोंडवार, प्रथमेश गोगटे, प्रा.खुशाल जाधव, ए एन यादव, डॉ श्वेता आचार्य, डॉ तुकाराम हापगुंडे, डॉ जी पी भालेराव, डॉ धनंजय देशमुख, डॉ पी एन कऱ्हाळे, डॉ रेविता कवले, डॉ एम बी डोळचाटे व पिअर एज्युकेटर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डीपीओ ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संजय पवार, श्रीमती टिना कुंदणानी, आशिष पाटील यांनी परिश्रम घेतले.

# नांदेडमधील ११ हजार जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांची होणार चौकशी : सोमय्या

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ सप्टेंबर -**

नावात दुरुस्ती करण्याच्या नावाखाली राज्यभरात गैरप्रकार सुरू असुन तब्बल ११ हजार जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे नावात सुधारणा करण्याच्या कारणावरून देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार असल्याचे भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

नावात सुधारणा करण्याच्या प्रक्रियेत यापुढे गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी शासनाकडून नवीन मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. ऑनलाइन कोडच्या माध्यमातून जन्म-मृत्यू प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची कार्यप्रणाली सुरू करण्यात येणार असल्याचे सोमय्या यांनी सांगितले. नांदेड-वाघाळा महानगरपालिकेत गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत नावात सुधारणा करण्याच्या कारणावरून तब्बल ११ हजार जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे देण्यात आल्याची माहिती समोर आली असून, या प्रमाणपत्रांचीही चौकशी करण्यात येणार असल्याचे महापालिका प्रशासनाने मान्य केल्याचा दावा सोमय्या यांनी केला. त्यामुळे या प्रकरणाच्या चौकशीकडे आता लक्ष लागले आहे.

जन्म-मृत्यू प्रमाणपत्राच्या या विषयाची जवावदारी आपण स्वीकारली असून, त्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून राज्यभर पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गेल्या तीन वर्षात जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांशी संबंधित प्रकरणांमध्ये राज्यभरात ६० एफआयआर दाखल करण्यात आले असून, सुमारे ५ लाख जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्यात आल्याचा दावा सोमय्या यांनी केला. या प्रक्रियेला पुढेही वेग देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यापुढे जन्म-मृत्यू प्रमाणपत्र देण्याची कार्यप्रणाली महाराष्ट्रात अधिक प्रभावी आणि पारदर्शक राहील, असा विश्वासही सोमय्या यांनी व्यक्त केला.

नांदेडमधील जवळपास २५ मतदारांची नावे वगळली गेली आहेत, अशी प्राथमिक माहिती पुढे आली आ-हे. काही बीएलओंनी घरी वसून काम केले, खोटा अहवाल तयार केला यामुळे मतदारांची नावे यादीतून वगळली गेली आहेत. यात दोन वीएलओंना निलंवित करण्यात आले आहे. याबाबतची चौकशी करण्याची मागणी आपण जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे, असे सोमय्या यांनी यावेळी सांगीतले.

# आंदोलनातही कृषी अधिकाऱ्यांचा शेतकऱ्यांना दिलासा
## बांधावर जाऊन मार्गदर्शनासह एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री निधीला देणार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ सप्टेंबर -**

कृषी विभागातील तांत्रिक संवर्गाचे राज्यव्यापी आंदोलन सुरू असतानाही, कृषी अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. एका बाजूला मागण्यांसाठी टप्प्याटप्प्याने आंदोलन सुरू असताना, दुसऱ्या बाजूला प्रत्यक्ष बांधावर जाऊन शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करण्याचे कार्य अविरतपणे सुरू असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य सहाय्यक कृषी अधिकारी संघटना, जिल्हा शाखा नांदेडचे अध्यक्ष शंकर पवार यांनी दिली आहे.

**आंदोलन काळातही बळीराजाला खंबीर साथ**

शेतकरी हा आमच्या कार्याचा केंद्रबिंदू असून, संपाच्या काळातही सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हे सर्व घटक शेतकर्यांच्या सेवेत तत्पर आहेत. सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेऊन कृषी अधिकारी प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन खालीलप्रमाणे मार्गदर्शन करत आहेत:

कीड-रोग नियंत्रण व तांत्रिक मार्गदर्शन: पिकांवरील कीड-रोगाचा आढावा घेऊन योग्य उपाययोजना सुचवणे. जैविक शेतीला प्रोत्साहन: रासायनिक कीटकनाशकांना पर्याय म्हणून जैविक कीटकनाशके तयार करण्याचे धडे देणे. दुष्काळी स्थितीत पिकांचे रक्षण: पाणी टंचाई व दुष्काळसदृश परिस्थितीत पिके कशी वाचवावीत याचे नियोजन. पाण्याचा कार्यक्षम वापर: ठिबक सिंचन पद्धतीचा वापर वाढवणे व इतर शासकीय योजना (उदा. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना) शेतकर्यांपर्यंत पोहोचवणे.

**सामाजिक बांधिलकी : १ दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीला**

एल-निमोच्या संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघाने सामाजिक बांधिलकी जपत राज्यातील १४,४४५ तांत्रिक अधिकारी व कर्मचार्यांचे एक दिवसाचे वेतन (सप्टेंबर २०२६) मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे पत्र कृषी मंत्री दत्तात्रय भरणे साहेब यांना महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघ चे अध्यक्ष बाबासाहेब जेजुरकर व सचिव विलास रिंढे , संजय पाटील, यांनी सादर करण्यात आले आहे.

**शासनाकडे मागण्या मान्य करण्याचे आवाहन**

शेतकऱ्यांना संपन्न बनवण्यासाठी आणि त्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी कृषी विभागाचा तांत्रिक वर्ग प्रामाणिकपणे काम करत आहे. मात्र, शासनाने देखील तांत्रिक कर्मचार्यांच्या रास्त मागण्यांची दखल घ्यावी. चुकीच्या पद्धतीने तयार केलेला आकृतीबंध रद्द करण्याचे व नवी तज्ञ समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात यावेत आणि शेतकऱ्यांना व कर्मचार्यांना न्याय देणारा नवीन आकृतीबंध तत्काळ लागू करावा, अशी आग्रही मागणी नांदेड जिल्हा कृषी सेवा महासंघाच्या वतीने शासनाकडे करण्यात आली आहे.

# विकासाची श्वेतपत्रिका जाहीर करण्याच्या मागणीसाठी धरणे आंदोलन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ सप्टेंबर -**

महाराष्ट्र अनुसूचित जमाती विकासाची श्वेतपत्रिका जाहीर करण्याच्या मागणीसाठी गुरूवार, दि. २४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता महात्मा फुले पुतळा आयटीआय ते जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे रॅली काढण्यात येणार असून नंतर शांततामय बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाचे नेतृत्व आदिवासी कोळी महादेव समाज मराठवाडा विभागाचे अध्यक्ष नागनाथराव घिसेवाड हे करणार आहेत.

रॅली व धरणे आंदोलनात नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी, युवक, महिला, कर्मचारी, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आदिवासी कोळी महादेव समाज मराठवाडा विभागाचे अध्यक्ष नागनाथराव घिसेवाड, व्यंकट मुदिराज, शशिकांत भुसेवाड, ॲड. परमेश्वर गोणारे आणि आदिवासी कोळी महादेव समाज नांदेड यांनी केले आहे.

# मनपातील बांधकाम प्रकरणावरून युवासेनेचे सचिन पाटील आक्रमक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ सप्टेंबर -**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ०६ अंतर्गत मौजे कौठा परिसरातील एका बांधकाम प्रकरणावरून युवासेना उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांनी जिल्हा अधीकारी,पोलिस उपमहानिरीक्षक ,मनपा आयुक्तां , ग्रामीण पोलीस स्थानक यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत बांधकाम परवानगी, अनधिकृत बांधकाम आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

तक्रारीनुसार, प्लॉट नं. २६, गट क्र. १२ येथे डॉ. आशा सतीश तोटावार-गादेवाड यांनी चार मजली निवासी बांधकामाची परवानगी घेतल्यानंतर पाचव्या मजल्याचे अनधिकृत बांधकाम केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच घरगुती परवानगीच्या आधारे व्यावसायिक दवाखाना सुरू करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणात अग्निशमन दलाची फसवणूक करून परवानगी मिळवून वैद्यकीय प्रमाणपत्र काढल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. मनपाकडून कलम ५४, कलम ५३ आणि कलम २६० अंतर्गत नोटिसा देण्यात आल्याचे तसेच पंचनामा केल्यानंतर सुमारे ६ हजार चौ. से.मी. बांधकाम अनधिकृत व नियमबाह्य असल्याचे नमूद करण्यात आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

सचिन पाटील यांनी तक्रारीत सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग आणि संबंधित बांधकाम धारक यांच्यात आर्थिक हातमिळवणी झाल्याचा आरोप केला असून, केवळ कागदी कारवाई करून अनधिकृत बांधकामावर प्रत्यक्ष कारवाई केली जात नसल्याचे म्हटले आहे. या आरोपांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी होण्याची मागणी त्यांनी केली आहे.

अनधिकृत बांधकाम तात्काळ पाडण्यात यावे, संबंधितांचे वैधकीय प्रमाणपत्र रद्द करण्याची कार्यवाही करावी आणि संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सचिन पाटील यांनी केली आहे. अन्यथा शासनाची फसवणूक करणाऱ्यांविरोधात न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## गोदावरी शिक्षण संस्थेच्या वतीने सत्यसाई बाबांच्या पादुकाचे स्वागत

**उमरी** -उमरी येथील प्रसिद्ध सोन्या चांदीचे व्यापारी व पंचक्रोशीतील दानशूर व्यक्तीमत्व विजय कुमार उत्तरवार यांच्या पुढाकारातून उमरी शहरात सत्यसाई बाबाच्या रथाचे आगमन झाले. या प्रसंगी शहरातून सर्व भक्ताच्या उपस्थितीत शहरातून मिरवणूक काढण्यात आली.यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी लेझीम पथकाने रथाचे स्वागत केले सायंकाळी गोदावरी शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख यांच्या वतीने संस्थेच्या प्रांगणात रथाचे स्वागत करून पादुकाचे दर्शन घेतले या वेळी रथा सोबत सत्यसाई समितीचे नांदेड जिल्हाध्यक्ष अनिल पत्रे, प्रा. शंकरराव कुंटूरकर,ड. विजय काकडे, किरण कोकडवार, राहुल वाघमारे, सतीश हदगावकर, अरविंद उत्तरवार, माजी सरपंच रामु रेड्डी कप्पावार, प्रशांत उत्तरवार, विश्वजित देशमुख, बंटी येरावार, महेश टिप्रेसवार व साई भक्त उपस्थित होते.

## आ.चिखलीकर यांच्या तालुक्यातील अनेक कुटुबाची सांत्वनपर भेटी

**लोहा** -रामानाईकतांडा (हाडोळी ) येथील सेवानिवृत्त आगार प्रमुख दता शिवराम राठोड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या कुद्धंबियांचे रामा नाईक तांडा (हडोळी) येथे जाऊन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सांत्वन केले.यावेळी नगराध्यक्ष शरद पवार ,सचिन पाटील चिखलीकर, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दता वाले. भगवान राठोड, साहेबराव काळे, अर्जुन राठोड, रमेश राठोड यासह कुटुंबीय उपस्थित होते. आजमवाडी येथील माजी सरपंच कार्यकर्ते मोतीराम मुंडे यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्याच्या घरी जाऊन नातेवाईकांचे सांत्वन केले, धावरी येथील शिक्षक सावन इंगळे यांच्या पत्नी यांचे अल्पसा आजाराने निधन झाले होते,याच गावातील संभाजी काळे यांचा मुलगा गजानन यांचे निधन झाले यांच्या घरी भेट देऊध सांत्वन केले

## मरवाळी तांडा आश्रम शाळेच्या वर्धापन दिनानिमित्त स्वयंशासन दिन साजरा

**नायगाव**-तालुक्यातील मरवाळी तांडा येथील प्राथमिक, माध्यमिक आश्रम शाळेच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्ताने स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला. शाळेचे प्राचार्य देविदास राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली,दि.२१ सप्टेंबर हा बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित प्राथमिक,व माध्यमिक आश्रम शाळेचा ४२ व्या वर्धापन दिन असून शाळेच्या भव्य प्रांगणात सोमवारी सकाळी प्रार्थनेनंतर प्राथमिकच्या सौ.कुसुम राठोड,पोस्ट बेसिक. ज्यु.कॉलेजचे प्रा.पांडुरंग येवले यांच्या उपस्थितीत सर्व प्रथम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रतन लक्ष्मण राठोड, यांच्या हस्ते हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक, व सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन,पुष्पहार अर्पण करुन अभिवादन अभिवादन केले तद्नंतर संस्थेचे सेवानिवृत्त प्राचार्य किशन राठोड, संस्थेचे कार्यवाहक तथा सरपंच डॉ. मधुकरराव राठोड यांनी देखील यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक, सरस्वतीच्या प्रतिमेचे ही पुजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तर'स्वयंशासन दिनीच्या' निमित्ताने प्राचार्य पदी सिद्धी अंकुश चव्हाण,पर्यवेक्षक रिद्धी अंकुश चव्हाण, पोष्ट बेसिक ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या श्रद्धा डोईवाड ह्या विद्यार्थिनीने देखील यावेळी वसंतराव नाईक, सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले.'स्वंयशासन' दिनातील योग्य पद्धतीने नियोजन लावून विषय विशेष सूचना देऊन अध्यापनाला सुरुवात करण्यात आली. दुपारनंतर स्वशासन दिनाचा समारोप करण्यात आला. यावेळी विद्यार्थी शिक्षकांनी अध्यापनावेळी आलेला अनुभव ,भावना ह्या मनोगतातून व्यक्त केल्या.तर आश्रम शाळेतील माध्यमिक शिक्षक नाव सूर्यवंशी आनंदराव यांनी स्वयंशासन दिनाच्या निमित्ताने सर्व विद्यार्थी शिक्षकांनी योग्य पद्धतीचे नियोजन लावून अतिशय नियोजनबद्ध आपले अध्यापनाचे कर्तव्य बजावल्याने यावेळी विद्यार्थी शिक्षकांचे मनापासून आभार व्यक्त केले तर उच्च माध्यमिक चे प्राध्यापक शंकर राठोड यांनी देखील वरील विद्यार्थ्यां व विद्यार्थिनी व चतुर्थ कर्मचारी या सर्वांचे कौतुक केले. तर सेवानिवृत्त प्राचार्य किशन राठोड यांनी माध्यमिक आश्रम शाळेचा आज हा ४२व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने ग्रामीण भागा तील या माळरानावरील शैक्षणिक रोपटांचे विशाल महावट वृक्ष करतांना सहन कराव्या लागलेल्या आठवणी ना यावेळी उजाळा देत 'स्वयंशासन' दिनातील विद्यार्थी विद्यार्थीनी सहशिक्षक,शिक्षिकेच बजावलेल्या कर्तव्याचे आभार व्यक्त करीत प्रशंसा ही केली. कार्यक्रमास प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ. कुसुम राठोड, शिक्षकवृंदातील नागोराव चव्हाण, एकनाथ मुनगिलवार, साहेबराव येवरे, सतीश हनमंते, फिरोज शेख, तसेच माध्यमिकचे शिक्षक धोंडीबा तेलंग, नागनाथ येल्लूरे, संभाजी मेहेत्रे, सूर्यकांत जाधव, आनंदराव सूर्यवंशी, व्यंकट रेकुळवाड, सुभाष राठोड, पांडुरंग जाधव, अजय राठोड, मुजमील शेख, प्रा. पांडुरंग येवले, हेमंत बावणे, आकाश सूर्यवंशी, बालाजी माळगे, अवचित शेजूळ, माधव वाघमारे, यादव कोरनुळे, गणेश मारताळेकर, शिवशंकर कोरे, दिलीप माने, प्रदीप लाभसेटवार, शंकर राठोड,सुशील नामवाड, सुभाष कदम, व्यंकट पवळे, रघुनाथ कल्याण, सौ. भारती बन, सौ. सुनीता कोटूलवार,यांच्यासह चतुर्थ श्रेणी कर्मचारी शिवाजी नारे, हनमंत सिंगवाड, शरद पवार आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोस्ट बेसिक ज्यु. कॉलेजचे प्राध्यापक हेमंत बावणे यांनी केले. आभार प्रदर्शनही बावणे सरांनी केले.

# किनवट आगारातील गहाळ झालेले चार टायर काही अंतरावर सापडले; पोलीसांत तक्रार दाखल

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २१ सप्टेंबर -**

किनवट एसटी आगारातून गहाळ झालेले चार नवीन टायर अखेर आगारापासून काही अंतरावर आढळून आले. १० सप्टेंबर २०२६ रोजी रात्रीच्या पाळीत आगारातील चार नवीन टायर गहाळ असल्याचे निदर्शनास आले होते. यानंतर आगार प्रशासनाने सदर टायरचा शोध घेण्यासाठी आगार परिसरात तपासणी केली. तसेच उपलब्ध नोंदी व सेन्सेक्स तपासण्यात आले. १९ सप्टेंबर रोजी केलेल्या तपासणीत हे टायर आगारातील कोणत्याही बसवर बसविण्यात आलेले नसल्याचे स्पष्ट झाले.

दरम्यान, २० सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता आयप्पा मंदिर परिसरातील वॉटर प्लांटकडे जाणाऱ्या गल्लीमध्ये एका भिंतीलगत चार टायर ठेवलेले असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर आगार व्यवस्थापक, सहाय्यक आगार व्यवस्थापक आणि टायर फिटर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तपासणीदरम्यान आढळून आलेले टायर क्रमांक एसटी महामंडळाच्या टायरशी जुळत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सदर चारही टायरचा पंचनामा करून ते अधिकृतपणे किनवट आगारात परत जमा करण्यात आले आहेत. मात्र, आगारातील नवीन टायर बाहेर कसे गेले आणि ते आयप्पा मंदिर परिसरातील गल्लीत कोणाच्या माध्यमातून ठेवण्यात आले, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. या प्रकरणाची चौकशी व्हावी आणि घटनेमागील नेमके कारण समोर यावे यासाठी किनवट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे पोलिस तपासानंतर या प्रकरणातील पुढील बाबी स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# एकात्मतेचा संदेश ; आदमपूरात मुस्लिम कुटुंबास गणेश आरतीचा मान

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २१ सप्टेंबर -**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील रहिवासी तथा चांडोळा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेतील कार्यालयीन सहाय्यक महमदरफी फकरूशा मदार आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सेवानिवृत्त वरिष्ठ सहाय्यक फक्रूशा पिरसाब मदार,कवी,गीतकार व पत्रकार जाफर फक्रूशा आदमपूरकर या सर्वधर्मसमभाव हा भाव उराशी बाळगणाऱ्या कुटुंबास आदमपूर येथील बुरूड गल्लीतील विराजमान जय श्री राम गणेश मित्र मंडळाकडून रविवार दि.२० सप्टेंबर रोजी सायंकाळी



ठीक ८ वाजता सामुहिक आरतीचा मान देण्यात आला.

गावात तथा परिसरात धार्मिक एकात्मतेचा संदेश अधिकाधिक मजबूत होईल. सार्वजनिक गणेश उत्सव म्हणजे संपूर्ण गावातील रहिवासी नागरिकांचा उत्सव होय.सर्वांनी एकत्र येऊन केलेल्या उत्सवाचा आनंद हा कालातीत असतो.मतभेद मनात ठेवल्याने फुकाचा अहंकार वाढीस लागतो. याने माणसांमाणसांत दुजाभाव निर्माण होतो.याच समाज विघातक बाबींना फाटा देत एक भूतपूर्व पारंपारिक एकोप्याचा आदर्श समाजापुढे ठेवण्यात आला.मुखोद्गत गणेश आरती अश्विन मठपती महाराज यांनी सादर करताच परिसरात चैतन्य निर्माण झाले.

यावेळी सामुहिक गणेश आरती कार्यक्रमास काशिनाथ हांद्रे मालीपाटील,मारोती कोलमवार, माणिकराव पाटील, विश्वनाथ मुंगडे,पुढारी पत्रकार गंगाधर पंगलवार, थडीसावळी सरपंच शिवचंदन अनपलवार,विठ्ठल नागेश्वर,विश्वनाथ नाईक,नरसिंग नाईक,सुरेशराव हांद्रे,पुंडलिक नाईक,रामराव पांडे,अनिल वाघमारे, राजपाल चौहाण,बालाजी नाईक, गोविंद नाईक, संजय नागेश्वर,बालाजी नागेश्वर,सचिन नाईक,बालाजी डोईफोडे,बालाजी सुनेवाड,शिवा डोईफोडे,अमोल नाईक,विनोद नाईक, साईनाथ सुनेवाड, बुरूड गल्ली परिसरातील महिला भगिनी, लहान मुलांची भरगच्च उपस्थिती होती.या उपक्रमाने जय श्री राम गणेश मंडळाचे परिसरात कौतुक होत आहे.

# सैनिकांच्या समस्यांवर मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार : सेवानिवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २१ सप्टेंबर -**

आजी-माजी सैनिक, शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या विविध अडचणी आणि प्रलंबित प्रश्न शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी सैनिक फेडरेशनच्या वतीने मराठवाडास्तरीय मेळाव्याचे आयोजन दि.२० सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. सैनिक फेडरेशनचे अध्यक्ष, माजी खासदार तथा सेवानिवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत यांच्या अध्यक्षतेखाली या मेळाव्यात सैनिकांच्या प्रश्नांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी वेळ घेऊन सविस्तर चर्चा करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

मेळाव्याला फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी निंबाळकर, मराठवाडा अध्यक्ष लक्ष्मण देवदे, नांदेड जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील डूमणे यांच्यासह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांचे व तालुक्यांचे पदाधिकारी तसेच आजी-माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध समस्या, अडचणी व प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. हे प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी



संघटनेच्या माध्यमातून पुढाकार घेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

येत्या डिसेंबर महिन्यात मुंबई येथे महाराष्ट्रस्तरीय महामेळावा आयोजित करण्याचे या बैठकीत निश्चित करण्यात आले. महामेळाव्याच्या नियोजनासाठी जिल्हाप्रमुख व पदाधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

दि.२० डिसेंबर रोजी झालेल्या मेळाव्याचे आयोजन सैनिक फेडरेशनचे नांदेड जिल्हाध्यक्ष तथा राजे छत्रपती अकॅडमीचे संचालक ज्ञानेश्वर पाटील डूमणे आणि मुदखेड नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे यांनी केले होते. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी नायब तहसीलदार हयून पठाण, कॅप्टन प्रकाश कस्तुरे, संघटक बळीराम गिराम, विठ्ठल कदम, भगवान नागरगोजे,जनार्दन शेजुळे, गजानन हम्पले, देवराव चौदंते, गजानन मोरचोंडे, संतोष हंबर्डे यासह मराठवाड्यातील तसेच जिल्ह्यातील मोठ्या संख्येने आजी-माजी सैनिक व कुटुंबीय उपस्थित होते.

# माजी मंत्री प्रा. ढोबळे यांच्या वक्तव्याचा उमरीत निषेध!

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २१ सप्टेंबर -**

नांदेड येथे मातंग समाजाच्या वतीने दि. १३ सप्टेंबर रोजी आयोजित अनुसूचित जाती उपवर्गीकरण समर्थन मोर्चात महाराष्ट्राचे माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी बौध्द समाजातील महिला व मुली विरुद्ध लैंगिक अत्याचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या जातीय व लैंगिक स्वरूपाच्या अपमानास्पद केलेल्या वक्तव्याचा उमरी शहरात आयोजित आंबेडकरी अनुयायांच्या बैठकीत तीव्र निषेध करण्यात आला. तसेच प्रा. ढोबळे यांच्यावर त्वरित कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात आली.ल

वकरच उमरी येथे अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी मोर्चा आयोजित करण्याचे ठरले असुन या अनुषंगाने बैठक घेण्यात आली. सदरील बैठक माजी उपनगराध्यक्ष अनिल सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.या वेळी वंचित बहुजन आघाडीचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष अरुण भद्रे, बौध्द महासभा तालुकाध्यक्ष शंकर सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीस पत्रकार डी. जी. तुपसाखरे, वंचित युवा आघाडीचे संदेश गायकवाड, ॲड. भीमराव सवई, नगरसेवक प्रतिनिधी अशोक झडते, माजी नगरसेवक राजेश सवई, भिमशाहीर भीमराव वाघमारे, रामदास शेबरे, संदीप लांडगे, गंगाधर गंगासागरे, वसंत सवई, के. एन. पवार, गंगाधर जोंधळे, बालाजी देवके, पत्रकार कैलास सोनकांबळे, सुरेश वाघमारे, मारोती जाधव, नागण कांबळे आदीसह बहुसंख्य आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते.

# आ.चिखलीकरांनी जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक पदाचा राजीनामा द्यावा : चंद्रसेन पाटील

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २१ सप्टेंबर -**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील संचालकपदावरून आता 'दहा वर्षांच्या नियमाचा' मुद्दा ऐरणीवर आला आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे संचालकपद सलग दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या कारणावरून रद्द करण्यात आले असेल, तर हाच निकष लोहा मतदारसंघाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्याबाबतही लागू झाला पाहिजे, असा थेट सवाल भाजप नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील यांनी उपस्थित केला आहे. बँकेकडून हकालपट्टीची नामुष्की ओढवून घेण्यापेक्षा चिखलीकरांनी स्वतःहून संचालकपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

नुकतीच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने राज्याचे सहकारमंत्री ना बाबासाहेब पाटील यांना लातुर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदावरुन हटवले आहे, बाबासाहेब पाटील यांचा सलग दहा वर्षे कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतरही ते संचालक म्हणून निवडून आले व संचालक पदावर कार्यरत होते मात्र रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने याबाबत दखल घेत त्यांचे पद रद्द केले आहे , निवडणूक काळात लातुर सह नांदेड, परभणी जिल्हा बँक निवडणूकीत काही संचालकांनी संबंधित नियम अधिसूचना निघाली नसल्याचा युक्तीवाद करत निवडणूक रिंगणात उतरले व संचालक झाले मात्र आता रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने दिलेल्या निर्णयामुळे सर्वांचेच धाबे दणाणले आहेत.

दरम्यान नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणूकीत आमदार प्रताप पाटील चिखलीकर हे सुद्धा अशाच प्रकारे निवडुन आले आहेत, त्यांच्या उमेदवारी अर्जावर भाजपा नेते चंद्रसेन पाटील यांनी आक्षेप घेतला होता अर्ज रद्द ही झाला होता मात्र लातुर येथिल विभागीय कार्यालयात अपील करत चिखलीकरांनी अर्ज कायम ठेवला व ते निवडणूकीत निवडून आले मात्र आता रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने लातुर च्या बाबतीत घेतलेल्या निर्णयामुळे चंद्रसेन पाटील पुन्हा सक्रीय झाले असुन त्यांनी बँकेने हकालपट्टी करण्या अगोदर चिखलीकरांनी राजीनामा द्यावा व नामुष्की टाळावी अशी मागणी प्रसिद्धी माध्यमातून केली आहे.

**संचालक पदावरुन पायउतार करणारच**

चिखलीकरांनी हकालपट्टी करून नामुष्की ओढवण्याआधी राजीनामा द्यावा, अन्यथा आपण याबाबत न्यायालयात जाऊ व चिखलीकरांना पदावरुन पायउतार करणारच अशी आक्रमक भूमिका चंद्रसेन पाटील यांनी मांडली आहे, नांदेड येथे चिखलीकरांचा अर्ज बाद ठरवण्यात आला होता, तो निर्णय कायम राहणार असुन लवकरच जिल्हा बँकेतील लोहा विभागाची संचालक पद रिक्त होणारच असल्याचा दावा त्यांनी केला आहे.